
बुधवार, ७ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 7 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-266 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## भंडारा उधळून रेल्वेगाडीचे स्वागत



जेजुरी : तीर्थक्षेत्र जेजुरीत असलेल्या ब्रिटिशकालीन रेल्वेस्थानकाचा केंद्र सरकारच्या भारतीय रेल्वे विकास धोरणातून आणि खा. सुप्रिया सुळे यांच्या प्रयत्नातून जेजुरी रेल्वे स्थानकाला नवे रूप प्राप्त झाले आहे. मंगळवारपासून सेंट्रल रेल्वेच्या पुढाकारातून सुरु झालेल्या पुणे- मिरज एक्स्प्रेस गाडीला थांबा मिळाला. जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने बेलभंडारा उधळून स्वागत करण्यात आले. रेल्वे कर्मचारी सागर बागडे यांनी हिरवा झेंडा दाखविला. तसेच रेल्वे चालकाचा श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जेजुरी सामाजिक कार्यकर्ते विजय खोमणे गणेश अबणावे, सचिन पेशवे, संजय माने, खंडू जानकर, संतोष खोमणे, नयम मुलाणी, मेहबूब पानसरे, रेल्वे स्टेशन मास्टर प्रदीप मेश्राम आदी उपस्तिथ होते. या मार्गांवरून धावणारी नवी गाडी ही साप्ताहिक न ठेवता दररोज सुरु करावी, अशी मागणी अबणावे यांनी केली. लांब पल्यांच्या गाड्यांनाही येथे थांबा मिळावा, याबाबत रेल्वेमंत्र्यांना निवेदन देणार असल्याची माहिती सचिन पेशवे यांनी दिली. या नव्या एक्सस्प्रेस गाडीचे मार्तंन्डविजय एक्स्सप्रेस अथवा जयाद्री एक्सस्प्रेस असे नामकरण करण्याची मागणी होत आहे. फोटो : विजयकुमार हरिश्चंद्रे

## काँग्रेसने घेतला लोकसभेच्या ४१ जागांचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरून चर्चेआधीच रस्सीखेच सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. काँग्रेसने लोकसभेच्या ४८ जागांपैकी ४१ जागांचा आढावा घेतला असून काँग्रेस नेतृत्वाने अधिकाधिक जागा लढविण्याचा मानस व्यक्त केला आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना ( उबाठा ) पक्षानेही लोकसभेच्या १९ जागांवर निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. शनिवारी काँग्रेसच्या बैठकीनंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघात काँग्रेसची ताकद आहे. काँग्रेसला मोठा जनाधार असून लोकांचा काँग्रेस पक्षावरील विश्वास आणखी वाढला आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष जेव्हा जागावाटपाची चर्चा करतील तेव्हा आमच्या मागण्या मांडू तसेच भाजपाला पराभूत कसे करता येईल, याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. २०१९ साली जेव्हा काँग्रेस आणि राष्ट्रवादीने आघाडीमध्ये लोकसभा निवडणूक लढवली होती, तेव्हा काँग्रेसच्या वाट्याला २५ जागा आल्या होत्या. पण त्यांना केवळ चंद्रपूर या एकमात्र मतदारसंघात विजय मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसने २३ जागांवर निवडणूक लढविली आणि त्यांना चार जागांवर विजय मिळाला होता. तर शिवसेना आणि भाजप युतीमध्ये शिवसेनेने २३ पैकी १८ जागांवर विजय मिळवला होता. भाजपाने २५ जागी निवडणूक लढवून २३ जागांवर विजय मिळवला. तथापि, जून २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे केवळ सहा खासदार उरले आहेत. ( महाराष्ट्रातील पाच खासदार आणि एक दिव दमन ) सध्याच्या घडीला महाविकास आघाडीकडे एकूण ११ खासदार आहेत.

# परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्रच नंबर एकवर : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : महाराष्ट्र सरकारने अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात दोन बड्या कंपन्यांसोबत एक मोठा करार केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज याबद्दल माहिती दिली आहे. यासबोतच महाराष्ट्रात परदेशी गुंतवणुकीत पुन्हा नंबर एकवर आला आहे, आता विरोधकांनी तोंडे बंद केली पाहिजे, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समचार घेतला.**

गुतवणूक कराराबद्दल माहिती देताना फडणवीस पुढे म्हणाले की, मंगळवारी महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रोजेक्टच्या संदर्भात १३ हजार ५०० मेगावॅटचे करार केंद्र सरकारची एनएचपीसी आणि खाजगी क्षेत्रातील टॉरेंट पावर या दोन कंपन्यांशी केले आहेत. तसेच यातून जवळपास ७१ हजार कोटींची गुंतवणुक होणार आहे. ३० हजारांपेक्षा जास्त लोकांना रोजगार मिळणार आहे. केंद्र सरकारने वारंवार आपल्याला सांगितले, तसेच जगभरात रिन्युएबल एनर्जी क्षेत्रात पंप स्टोरेज ही अत्यंत महत्वाची व्यवस्था आहे. ज्यामध्ये खालच्या जलाशयातून दिवसा सोलरच्या माध्यमातून पाणी उचलले जाते आणि वरच्या जलाशयात सोडले जाते आणि रात्री वरच्या झलाशयातून ते पाणी खाली आणून टर्बाइनच्या माध्यमातून विजनिर्मीती केली जाते. यामुळे २४ तास आपल्याला पारंपारिक उर्जा कमी किंमतीत मिळते, असे ते म्हणाले.


ग्रीड स्टॅबिलाइज करण्यासाठी ही वीज एका मिनीटात सुरू करता येते आणि आवश्यकता नसल्यास ती लगेच बॅकडाऊन देखील करता येते, असेही फडणवीस म्हणाले. महाराष्ट्राने आज केलेले करार ऐतिहासिक आहेत. इतकी गुंतवणुक कुठेही आली नाहीये. महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात गुंतवणुक येत आहे. कालच एफडीआयचे आकडे जाहीर झाले आहेत. २०२०-२१ मध्ये गुजरात एक नंबरवर होता, २०२१-२२ मध्ये कर्नाटक एक नंबरवर होते. आता आमचे सरकार आले आहे, आता महाराष्ट्राला नंबर एक वर नेऊ. आता डीआयपीपीने आकडे घोषित केल्यानंतर एफडीआयमध्ये पहिल्या क्रमांकवर महाराष्ट्रच आहे. ही आकडेवारी पाहिल्यावर उद्योग इकडे-तिकेडे गेले, असे म्हणत होते आता तरी त्यांची तोंड बंद केली पाहिजे, असेही फडणवीसांनी सांगितले.

## जागीर कौर यांनी अकाली पंथाची स्थापना करत अकाली दलाला दिले आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंजाब, हिमाचल प्रदेश, केंद्रशासित प्रदेश चंदीगढ आणि अमृतसरमधील दरबार साहिब या गुरुद्वारांचे प्रशासक म्हणून काम करणारी यंत्रणा शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीच्या निवडणुकीत माजी अध्यक्षा बीबी जागीर कौर यांनी आपले स्वतःचे पॅनल उभे करण्याची घोषणा केली आहे. शिरोमणी अकाली पंथ या नव्या पॅनलची घोषणा करून बीबी जागीर कौर म्हणाल्या की, SGPC ला आता एका कुटुंबाच्या ( बादल परिवार ) नियंत्रणातून मुक्त करण्याची वेळ आली आहे. जागीर कौर यांनी एसजीपीसीची निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यानंतर त्यांची अकाली दलातून हकालपट्टी करण्यात आली होती. अकाली दलाने पाचव्यांदा त्यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्याला विरोध केल्यानंतर कौर यांनी निवडणूक लढविण्याची घोषणा केली होती. कौर यांनी अकाली दलामधील 'बंद लिफाफा' संस्कृतीवर जोरदार टीका केली. एसजीपीसीचा अध्यक्ष कोण होणार, हे अकाली दलाचे वरिष्ठ ठरवितात, असाही आरोप त्यांनी केला. अकाली दलाची राजकीय परिस्थिती सध्या डळमळीत असताना जागीर कौर यांनी घेतलेला निर्णय पक्षासाठी आणखी त्रासदायक ठरू शकतो.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

दुपारी ते एखाद्या झाडाच्या सावलीत बसतात. आपल्या सोबत जी काही चटणी भाकरी आणली असेल ती खातात, दोन घोट पाणी पितात. आपल्या बरोबरच्या व्यक्तींशी गप्पा, हास्यविनोद करतात आणि ती ऊर्जा सोबत घेऊन पुन्हा आपल्या कामाला लागतात. या अर्थानं दुपारी ही एक प्रकारची 'होरेगल्लू' आहे. ती मनावरचा ताण कमी करते. जसा ऋतू असेल किंवा जसं हवामान असेल, तशी दुपारची रूपं वेगवेगळी असतात. ग्रीष्मातली दुपार अंगाची लाही लाही करते. कधी कधी तर वाराही बंद असतो. डोंगरावरील, जंगलातील झाडं एखाद्या चित्रासारखी स्तब्ध असतात. अशा वेळी दुपार तुम्हाला सांगते, 'बाबारे, बस थोडा. अंमळ विश्रांती घे. उन्हात विनाकारण फिरू नकोस.' ती जणू सांगत असते, 'जरा विसावू या वळणावर...' दुपार आहे म्हणून तर थोड्या वेळाने तुला हवीहवीशी वाटणारी सांज येईल, रात्र येईल आणि पहाटही उगवेल. थोडा धीर धर. वसंतातली दुपार त्या मानाने जरा प्रसन्न असते. वसंत हा तर कवी, लेखकांचा आवडता ऋतू. मुबलक फळे, फुले उपलब्ध असतात. झाडांना नवी पालवी फुटलेली असते. दसरा दिवाळीला आपण जसे नवीन कपडे परिधान करतो, तशी वसंत ऋतूत निसर्गाचीही दिवाळी असते. जुनी पालवी टाकून देऊन झाडं नवीन पालवी धारण करतात. गुलाबी, पोपटी, हिरवी अशी विविध रंगछटा असलेली पानं दृष्टीस पडतात. या ऋतूत झाडांना मोहर आलेला असतो. त्याचा मंद दरवळ सगळीकडे पसरलेला असतो. या ऋतूत निसर्ग भरभरून रूप, रस आणि गंध प्रदान करतो. अशा ऋतूतली दुपारही छान वाटते. ऊन असतेच पण शीतल वाऱ्याच्या लहरी अंगावर जणू मोरपीस फिरवतात. उन्हाची तलखी कमी करतात. वर्षा ऋतूतली दुपार बऱ्याच वेळा ढगांच्या छायेनं आच्छादलेली असते. अशा वेळी उन्हाचा तडाखा जाणवत नाही. वर्षा ऋतूत सकाळी आणि संध्याकाळी बऱ्याच वेळा हमखास पाऊस असतोच. पण दुपारही कधी कधी पाऊस घेऊन येते.



## आनंदी पहाट

## उपासनेचा काळाशी जवळचा संबंध

आधुनिक केसरी

सद्यःस्थितीत त्या सर्वच बाबी काळाच्या ओघात बदलल्या आहेत. वेळ हा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या सर्व गोष्टींशी निगडीत असतो, म्हणून आपण अनेकदा वेळेच्या परिमाणाबद्दल ऐकतो. वेळ हा जीवनाचा एक आवश्यक आणि अविभाज्य घटक आहे. वाढदिवस, वर्धापनदिन आणि बाळांचा जन्म यासह अनेक बाबतीत वेळ विशेष टप्पे दर्शवते आणि आपल्याला आपले दैनंदिन जीवन तसेच क्रियाकलाप आयोजित करण्यात मदत करते. जेणेकरून आपण अधिक संघटित, उत्पादक आणि आनंदी जीवन जगू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सूर्यास्तापासून रात्रीपर्यंत, भरती-ओहोटी, चार ऋतू सर्व काही वेळेवर अवलंबून असते. मानवी जीवन वेळेनुसार मोजले जाते आणि सूर्य, चंद्र तसेच पृथ्वीचे चक्र हेच मुळी वेळ म्हणून ओळखले जाते. काळाव्दारे आपल्याला वर्ष, महिना, आठवडा, दिवस, तास, मिनिट, सेकंद आणि त्यातील काही भाग कळतात. प्रत्येक वेळी आपल्याला वस्तूंच्या गतीची गणना करण्यासाठी त्याची काहीना काही मदतच होते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा इतिहास आपल्याला कळतो आणि या घटनांचे दस्तऐवजीकरण करण्यात आपल्याला मदत होते. विशिष्ट घटनेची वेळ ठरवण्यासाठी इतिहासकार वेळेवर अवलंबून असतात. पुरातन वास्तू आणि कलाकृतींचे वय ठरवण्यासाठी वेळ देखील महत्त्वाचा आहे. जितका वेळ आणि वेळ अप्रचलित असेल तितका तो अधिक मौल्यवान आणि अधिक महाग आहे. आपल्याला उपासनेची कृत्ये माहीत आहेत, विशेषतः प्रार्थना, जी देवावर विश्वास ठेवणाऱ्या साधकांसाठी महत्वाची समजली जाते, ती विलंब न करता ठरलेल्या वेळी केली जाते. त्याचप्रमाणे, सर्व उपासनेचा काळाशी जवळचा संबंध असल्याचे आपल्याला आढळते. ह्याचाच अर्थ, प्रत्येक व्यक्तीला वेळेचे भान राखणे आवश्यक असते. अनेकदा असे दिसून येते कि, काळ आपल्याला सांगून येत नाही आणि वेळा आपल्याला पाळता येत नाहीत.



आधुनिक केसरी

## न घडो कुकर्म | कधी काळी ||

करावे ते कर्म | हिताचे जनास ||
कारण दुःखास | असु नये ||१||
चांगलें वांगले | घ्यावे पारखून ||
संग निरखून | कर मना ||२||
पाप-पुण्य भेद | जाणावा सावध ||
अनुभव सिध्द | कसोटीने ||३||
आत्मवृत्ती व्हावी | भक्तीमय सिध्दि ||
कृपावंत रिध्दि | अंती लाभो ||४||
माझ्या मनी देवा | रूजावे सत्कर्म ||
न घडो कुकर्म | कधी काळी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


कपोलौ कोमलौ तेऽम्ब
चोजस्विनौ सुशोभितौ |
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || १५ ||
अंबे, तुझे कपोल कोमल, ओजस्वी आणि सुंदर आहेत. अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कर्म छूटे जेहि कर्म से,
सो विकर्म शुभ कर्म ।
जिज्ञासू आश्रय रहें, सेवा करत विकर्म
।।५९।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय) ०५/१२/५९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :ज्या कर्मां द्वारे कर्मबंधनातून सुटण्याचा प्रयत्न केला जातो, ती शुभ कर्मे विकर्म आहेत. ज्यांचा आश्रय घेत जिज्ञासू गुरूंची सेवा करतात, ते विकर्म आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी

पुंडलिका भेटि परब्रम्ह आले गा।। मग मनात विचार येतो कसे आहे परब्रम्ह ? तर मित्रांनो याचं निरूपण म्हणजे ूक्ष्मभूतेंननिरूपण होय. जे शुध्द, निर्मळ, नित्य व पूर्ण आहे. असे अनादी व अनंत शाश्वत सत्य म्हणजे परब्रम्ह होय. ते जिवंत आहे, त्यामध्ये अनंत शक्ति आहेत. आणि ते ब्रम्हस्वरूपामध्ये आहे.ते शांत व निर्जीव नाही. एक विलक्षण शक्ति परब्रम्हाच्या थोड्याशा भागात निर्माण झाली, त्या भागाला "अहं" असे स्फुरण झाले, त्यालाच "मूळमाया" असे म्हणतात. मूळमाया घेऊन अनुभवायला येणारे ब्रम्ह म्हणजेच ईश्वर होय. तो सगळीकडेच व्यापून राहिलेला आहे. मूळमायेच्या पसा-यात हे विश्व युगानुयुगे अखंड अव्याहत पणे ये जा, करत करत मानव सुक्ष्म किटक,झाडेवने नदी डोंगर आकाश ,सुर्यचंद्र या अफाट विश्वातील सगुणनिर्गुण व्याप्त सर्व स्रोत आपले कार्य करत आहेत. अव्याहतपणे सदोदीत. त्रिगुण परब्रम्ह तुझा अवतार।। त्याची काय वर्णू लीला अपार।। शेषादिक शिणले त्या न लागे पार।। तेथे कैसा मूढ मी करू विस्तार।। मित्रांनो त्यांच वर्णन करण्यासाठी मी अपूरी आहे. पण मला जे समजते ते सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न मात्र नक्कीच करते. जो कधीच भंग होत नाही ते अभंग तर मूळमाया एकीकडे अनंत जीव बनवते तर दुसरीकडे त्रिगुणापासून पंमहाभूते तयार करते. जीव काय जडद्रव्यरूप पंचभूते काय अखेर सगळे ईश्वराचीच रूपे आहेत,ते परब्रम्ह आहे. आपण अज्ञानी आहोत तर ईश्वर ज्ञानी आहे. ईश्वर स्वस्वरूप कधीच विसरत नाही तर जन्माला आलेला प्रत्येक जीव स्वस्वरूप ओळखू शकत नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंताचे अनुसंधान राखावे

आधुनिक केसरी

फार दिवस वापरून जोडा फाटला की तो कितीही दुरुस्त केला तरी पुनः पुनः फाटतोच. तसेच शरीराचे आहे. शरीर जीर्ण झाल्यावर त्याला काही ना काही तरी होतच राहते. दुरुस्त केलेल्या जोड्यातला एखादा खिळा जर पायाला टोचू लागला तर मात्र त्याला जपावे लागते. तसे, आजारपणामुळे मनाला टोचणी लागली तर जपावे आणि त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. आपल्या आजाराचा, म्हातारपणाचा आपण फायदा करून घ्यावा. एखादी शहाणी सुगरण बाई ज्याप्रमाणे कोंड्याचा मांडा करते, त्याप्रमाणे आपण आपल्या दुखण्यामधून भगवंताचे अनुसंधान टिकवायला शिकले पाहिजे. अनुसंधानात असलो की प्रपंचात मजा आहे; अडचणी आणि संकटे यांचीसुद्धा मजा वाटेल. पोहायला येणाऱ्या एखाद्याला नुसते सरळ पोहायला सांगितले तर आवडणार नाही. तो उड्या मारील, बुड्या मारील, वाकडातिकडा पोहेल, तसे भगवंताच्या अनुसंधानात राहिले तर प्रपंचाची मजा वाटेल. कोणतीही गोष्ट एकदा ओळखली की मग तिची भिती वाटत नाही.



विषय जोवर ओळखले जात नाहीत तोवरच ते आपल्याला त्रास देतात. याकरिता, ज्या ज्या गोष्टी होत असतात, त्या त्या भगवंताच्या इच्छेनेच होत आहेत, ही जाणीव ठेवून वृत्ती आवरण्याचा प्रयत्न करावा. परमार्थाच्या आड आपले आपणच येत असतो. आपली वृत्ती जिथे जिथे वावरते तिथे भगवंताची वस्ती असते. म्हणून वृत्ती जरी कोणतीही उठली तरी तिथे भगवंताची आठवण केली तर ती चटकन मावळते. आपण नेहमी आपल्या उपास्य देवतेचे स्मरण करीत असावे. त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थना करावी की, "हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. आजवर जगाचा मी अनुभव पाहून घेतला. तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही असे भासू लागले, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाही. माझ्या अज्ञानाने मी आज स्वतःच्याच आड येत आहे. तरी तुझी, म्हणजे पर्यायाने माझीच, ओळख पटावी, आणि त्यात मी तुला पाहावे, हीच माझ्या जीवितातली शेवटची इच्छा आहे. ही इच्छा तुझ्या कृपेशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. तरी, हे भगवंता, माझे मन तुझ्या चरणी राहो असे कर. यापेक्षा मला जगात दुसरे काहीही नको. आता मी तुझा झालो. यापुढे जे काही होईल ती तुझीच इच्छा मानून मी राहीन, आणि तुझे नाम घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. तू मला आपला म्हण. वृत्ती स्थिर झाली की त्याच्या मागोमाग समाधान येतेच.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो न हि सर्वत्र चन्दनं न बने बने ॥
सरलार्थ : प्रत्येक पर्वतावर माणिक नावाचे रत्न आढळत नाही. प्रत्येक हत्तीच्या डळात मोती असत नाही. संत महात्मे सर्वत्र सापडत नाहीत. (आणि) प्रत्येक बनात चंदन वृक्ष गवसत नाही. स्पष्टीकरण- जगात मोलाच्या ज्या वस्तू असतात, त्या दुर्मिळ असतात. शोध घेऊन त्यांचा संग्रह करावा लागतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



# पिंपळवाडी ते गिरडाघाटाचे काम पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**बाकी रहिलेला रस्ता पूर्ण** : हा दोन कि .मी .रस्ता वन विभागामुळे थोडा थांबविण्यात आला होता .वनविभागाने परमीशन देताच आम्ही तात्काळ या पिंपळवाडी ते गिरडाघाटाच्या पायाथ्यापर्यत रस्ता चांगला करून दिला आहे .भाविक भक्तांना, प्रवासी यांना त्रास होणार नाही खरोखरच दहा ते पंधरा वर्षं पासून हा खूपच खराब होऊन चाळणी झाली होती .भाविक भक्त व प्रवासी यांनी हा त्रास सोशला त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो .आणि आजूक हि काही छोटेमोठे काम व पुलाचे काम बाकी आहे ते आम्ही लवकरच पूर्ण करु . **नितिन राठोड इंजिनिअर सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे हे गाव राज्यात भगवान चक्रधर स्वामी तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. दररोज हजारो भाविक भक्त सावळदबारा येथील चक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी येतात आणि याच रस्त्याची पूर्ण वाट लागली दोन कि.मी.पिंपळवाडी ते गिरडा घाटाच्या पायथ्यापर्यत पूर्ण वाट लागली होती.परंतु सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी वेळोवेळी निवेदने देऊन या कि.मी.रस्ताची अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांनी दखल घेऊन राहिले रस्ताचे काम पूर्ण केले याबद्दल प्रवासी, ग्रामस्थ व माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी आभार मानले.देव्हारी, पिंपळवाडी मार्गे गिरडा घाटला व लालमातीकडे जोडला जानारा रोड या रोडाचे काम सार्वजनिक बांधकाम फर्दापूर विभागाचे वरिष्ट अधीकारी व ठेकेदार यांनी पूर्ण केले या रोडचे तीनतेरा वाजविले होते.सावळदबारा येथे महानुभीव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचे मोठे तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.येथे येणाऱ्या जाणाऱ्या भाविक भक्त यांना तारेवरची कसरत करावी लागत होती.रोडावरती मोठमोठे खड्डे पडुन पुर्ण खडी गिट्टी बाहेर निघुन पडलेली असल्यामुळे या परिसरामधुन भाविक भक्तांना प्रवास करताना प्रवाशांना स्वताचा जिव मुठीत धरुन तारावरची कसरत करत प्रवास करावा लागत होता.परंतु आता सावळदबारा ते बुलढाणापर्यंत संपूर्ण रस्ता चांगला झाला आहे. असे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

# ‘त्या’ वाघिणीचा मुक्काम पांगडी जंगलात

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गोंदिया शहरापासून काही अंतरावर वाघिणीचे वास्तव्य गेल्या आठ दिवसांपासून आहे. वाघिणी करिता काही मार्ग तात्पुरते बंद करण्यात आले आहे. पण नागरिकांनी घाबरण्याचे काहीच कारण नाही असे वनविभागाने स्पष्ट केले आहे. वनविभागाच्या पांगडी गावालगत असणाऱ्या गावांना सूचना देण्यात आल्या आहेत. वाघीण नवीन असल्याने वास्तव्यासाठी जागेची पाहणी करीत आहे, असा वनविभागाच्या अभ्यास सांगतो. पण वन विभागद्वारे सध्या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून वाघिणीवर वनविभागाचे लक्ष ठेऊन आहे. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत २१ मे रोजी गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात चंद्रपुर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी जंगलातून दोन वाघिणी सोडण्यात आल्या होत्या. त्या सोडलेल्या दोन वाघिपीपैंकी एक वाघीण ही प्रकल्पातून भरकटली. गोंदिया शहरा जवळ असलेल्या पांगळी जलाशय व जंगल परिसरात ती असून सुरक्षेच्या दृष्टीने पांगडी येथील जंगल परिसरातील मार्ग पर्यटकांसाठी सध्या बंद करण्यात आले आहेत. तर ठिकठिकाणी वनकर्मचारी तैनात करण्यात आले आहे.




# सावळदबारा परिसराला पावसाने झोडपले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परिसरात गेल्या १५ ते २० दिवसांपासून सोयगाव तालुक्याला उष्णतेच्या लाटांनी हैराण केले. रविवारी दुपारी १:३० वाजतानंतर तयार झालेल्या अचानक ढगांच्या प्रभावामुळे १:०० वाजेपर्यंत वातावरण हलके ढगाळ होते. दुपारी एकचा सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस येऊन गारपीट झाल्याने शेतात तसेच रस्त्यावर पाणीच पाणी होते. रविवारी सकाळपासून कमालीचे तापमान होते मात्र आकरा वाजेपर्यंत तापमान वाढते होत असताना कडाक्याच इन असल्यामुळे सतत दोन दिवसापासून शेतातील कामे करणे साठी शेतकऱ्यांनी शेतात धाव घेतली होती. मात्र एक वाजेच्या सुमारास आभाळ गड भरून वादव्यै चाऱ्यासह जोरदार मुसळधार पावसाने नागरिकांनची भादळ उठवली. तुफान वाऱ्यासह पावसाने जोरदार सुरवात होताच गावातील परावरील पत्रे अशी उठली काही शेकंदा मध्ये एकामेकाच्या पत्रावर जाऊन पडले तर टिन पत्रे जवळपासच्या शेतात जाऊन पडले यामध्ये ग्रामस्थाची पत्रे जमा करण्यासाठी एकत्र तारांबळ उडाली.डॉ.जफर सय्यद याचे पत्रे व दगड पडून पांडुरंग आंजुळे यांच्या घरावर पडून पत्रे फाडून आत मध्ये घुसले मात्र घरी कोणी नसल्याने कोणत्याही हानी झाली नाही. तसेच अति वेगाने येणाऱ्या वारेमुळे अनेक भागांत सह अनेक ठिकाणी झाडे उपटुन पडली, गावातील संदीप राजपूत यांचे मोठे लिंबाचे झाड पडुन आतोनात घराचे नुकसान झाले अचानक चक्रवादळी वारेमुळे बऱ्याच नागरिकांनचे पत्रे उडाली आहे.काहीचे सापडले तर काहीची टिन पत्रे आजूकही बेपत्ता झाले आहे.तर पांडुरंग नारायण आंजुळे यांचे सोलर वॉटर प्लॉन व शिवाजी विद्यालयात मोठे नुकसान झाले आहे.



# उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महावितरण तत्पर : डॉ. गोंदावले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या विकासात उद्योजकांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महावितरण नेहमीच तत्पर आहे. उद्योजकांचे वीजपुरवठा व इतर सेवांबाबतचे सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, अशी ग्वाही महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांनी दिली. महावितरणच्या वर्धापनदिनानिमित्त औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयात प्रातिनिधीक स्वरूपात औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील उच्चदाब ग्राहकांचा सत्कार डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उद्योजकांकडून त्यांनी वीजपुरवठ्याबाबतचे व इतर प्रश्न जाणून घेतले. स्थानिक समस्यांवर तातडीने मार्ग काढण्याचे तर धोरणात्मक विषयांवर महावितरणचे मुख्यालय व शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. औरंगाबाद व जालना जिल्ह्यात वाढत्या विजेची मागणी पाहता येत्या दशकभराचे नियोजन महावितरणने केले आहे. पायाभूत सुविधा बळकटीकरणाचे कामही सुरू आहे. तसेच महापारेषणसोबत चर्चा करून उच्चदाब ग्राहकांचे प्रश्न सोडवू, असे डॉ.गोंदावले म्हणाले. यावेळी जालना येथील भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्सचे संचालक नितीन काबरा, औरंगाबाद येथील स्टरलाईट टेक्नॉलॉजीजचे सहयोगी महाव्यवस्थापक बृजेश कुमार राय, रामगोंडप्पा पाटील तसेच ह्योसंग इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक जै स्योक आन यांचा डॉ.गोंदावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ.मुरहरी केळे, उत्क्रांत धायगुडे, सतीश खाकसे, विश्वास पाटील उपस्थित होते.



# सुनक यांनी सुनावलं!

आधुनिक केसरी

ब्रिटनमध्ये सध्या इतर देशांमधून आश्रयासाठी येणाऱ्या नागरिकांचं प्रमाण वाढू लागलं आहे. यामुळे स्थानिक हॉटेल्स आणि इतर सुविधांवर ताण निर्माण होत असल्याचं दिसू लागलं आहे. यासंदर्भात ब्रिटन सरकारने बेकायदेशीर स्थलांतरितांमुळे स्थानिक सुविधांवर निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना राबवल्या आहेत. या उपाययोजना फलदायी ठरत असल्याचं सांगतानाच त्याबाबत तक्रार करणाऱ्या स्थलांतरीतांची ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी चांगलीच कानउघाडणी केली आहे. ब्रिटनं जगातील कठीण परिस्थिती असणाऱ्या देशातील नागरिकांसाठी राजाश्रय धोरण जाहीर केलं होतं. त्यानुसार, या देशांमधून स्थलांतरितांना ब्रिटनमध्ये आश्रय देण्याची भूमिका घेण्यात आली होती. मात्र, यात अनेक बेकायदेशीर स्थलांतरीतही ब्रिटनमध्ये येत असून त्यामुळे ब्रिटनमधील हॉटेल्स आणि इतर सोयी-सुविधांवर ताण निर्माण होऊ लागला. त्यामुळे स्थानिक पातळीवर नाराजीही व्यक्त होताना पाहायला मिळाली. या पार्श्वभूमीवर ऋषी सुनक सरकारने काही उपाययोजना जाहीर केल्या. या उपाययोजना आता फलदायी ठरत असल्याचं सुनक यांनी म्हटलं आहे. केंटमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत ऋषी सुनक यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "मी तुम्हाला वचन देतो, की आपण स्थानिक हॉटेल्समधून बेकायदेशीर स्थलांतरितांना हटवून त्यांची दुसरीकडे सोय करू. स्थानिक सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी आपण या लोकांना थेट बोटीवरच हलवू. येत्या १५ दिवसांत त्यातलं पहिलं जहाज पोर्टलँडमध्ये दाखल होईल. अजून दोन जहाजांची व्यवस्था करण्यात आली असून त्यावर १ हजार जणांची व्यवस्था होऊ शकेल", असं सुनक म्हणाले आहेत. काही ठिकाणी हॉटेलमध्ये आहे त्या खोल्यांमध्ये एकाहून अधिक स्थलांतरितांना सामावून घेण्याचेही निर्देश सुनक यांनी दिले आहेत. दरम्यान, सुनक सरकारच्या या धोरणाचा स्थलांतरितांनी काही ठिकाणी निषेधही केल्याचं समोर आलं आहे. यावरून ऋषी सुनक यांनी स्थलांतरितांना सुनावलं आहे. "शक्य तिथे एका खोलीत अधिक स्थलांतरितांना सामावून घेण्यास सांगितल्यामुळे आपण अशा अतिरिक्त ११ हजार ५०० जागा तयार करू शकलो आहोत. ज्या स्थलांतरितांनी यावर आक्षेप घेतलाय, त्यांना मी सांगेन की ही पूर्णपणे न्याय्य प्रक्रिया आहे. तुम्ही मृत्यूच्या, छळाच्या आणि देहदंडाच्या भीतीने इथे येत असाल तर तुम्ही ब्रिटिश करदात्यांच्या पैशांवर चालणाऱ्या लंडनमधील हॉटेल्समधल्या खोल्यांमध्ये तडजोड करण्याची तयारीही असायला हवी", असं ते म्हणाले.

# घाणेरड्या राजकारणाचा खा. राऊतांनी गाठला कळस



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

असं म्हटल्या जातं राजकिय पटलावर काम करणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या वर्तनातून समाजात आदर्श पेरले जातात आणि नव्या पिढीतील मुलं त्याचं अनुकरण करतात. जसा राजा तशी प्रजा अशी एक म्हण. उदा.व्ही.पी.सिंगानं टोपी घातली तोच आदर्श जनतेने घेतला. अमिताभ बच्चनची मोठ्या बॉटमची पँट आली तेव्हा समाजानं फॅशन म्हणुन तशीच पँट घातली. कुणाची कडक टोपी तर कुणाच चारित्र्यसंपन्न वर्तन, कुणाच्या अंगातला सेवाभाव, तर कुणाची संवेदना? ह्या साऱ्या गोष्टी जेव्हा समाजात लोकप्रतिनिधीकडून पेरल्या जातात कदाचित आदर्श म्हणून स्विकारतात. पण जेव्हा राजकारणी बालिशपणाचं राजकारण करतात आणि नको ते प्रदर्शन अगदी किळसवाणी समाजासमोर दाखवतात.

तेव्हा मात्र बाप लेकाला सांगतो रस्त्यावर उभ्यानं लघुशंका करू नका. पण जेव्हा बापच करत असेल तर मग काय आदर्श घ्यावा ? तसंच काही खा.संजय राऊत यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. अगदी घाणेरड्या राजकिय संस्कृतीचे बीजे या माणसाने महाराष्ट्राच्या राजकारणात रूजवली असुन आपण जाहिरपणे थुंकल्याचा स्वाभिमान त्यांना वाटत असेल पण राज्यातील जनतेने कशा प्रकारे तुमचं राजकारण किळसवाणी हे निश्चित ठरवलं. खरं तर बालवाडीत शिक्षण घेणारा मुलगा देखील थुंकी आली तर हेडमास्तरला विचारून वर्गाबाहेर जावुन थुंकतो.

एका पत्रकारांनी खा.संजय राऊताला विरोधी गटाच्या आमदाराचं नाव घेवुन प्रश्न विचारला आणि त्यांनी तिटकारा करत चक्क थुंकल्याचं नाटक केलं. विशेष म्हणजे कॅमेरातली बातमी असल्यानं देशातल्या साऱ्या लोकांना पहायला मिळाली. कदाचित प्रिंट मिडियाचा जमाना असता तर जे केलं ते दिसलंही नसतं. पण हा माणुस किती घाणेरड्या राजकारणाचं अनुकरण करतो ? हे लोकांनी पाहिलं. मुळात राऊताचा स्वभाव स्वतःला ठाकरी बाणा समजावणारा आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या भुमिकेत आपणच आहोत हा त्यांच्या अंगी असलेला आविर्भाव खऱ्या अर्थाने शिल्लक राहिलेल्या शिवसेनेला समुळ नष्ट केल्याशिवाय रहाणार नाही. अजुन वेळ गेलेली नाही पण मातोश्रीचे रक्षणकर्ते उद्धवजींनी सावध होण्याची गरज असुन थुंकलेलं आवडलं का ? यावर त्यांनी काहीही बोलावं अशी आता लोकांची इच्छा लक्षात येते. राजकारणात लोकांची मान्यता असलेलं नेतृत्व, आणि ज्यांच्या पाठीमागे चितपाखरू नाही तरी पण नेतृत्व करणारं नेतृत्व अशा दोन भुमिकेत पुढारी लक्षात येतं. वर्तमान स्थितीत ज्यांच्या मागे कुणी नाही असे मिशावर ताव मारत डिजिटल राजकारण करताना जास्त दिसतात आणि ज्यांच्या मागे लोकमत ते मात्र संयमानं वैचारिक राजकारण करताना दिसतात. महाराष्ट्राच्या राजकारणातला स्तर मागच्या चार-पाच वर्षात पुर्णतः घसरला असुन त्याला जबाबदार असेच राऊतासारखे पुढारी आहेत असं म्हटलं तर कारण केवळ आरडाओरड करायचे, लोकांची बदनामी कसं होईल ? एवढंच बघायचं. बिनबोभाट आरोप करायचे आणि आपण जगाच्या पाठीवर फारच हुशार या आविर्भावात वागायचं. मागच्या दोन-चार वर्षात यांनी खरंच किळसवाणं राजकारण केलं. वास्तविक पहाता रोज काहीतरी बडबड केली की आपली बातमी होवु शकते हे त्यांना व्यसन लागलं. भर पत्रकार परिषदेत अनेकांना शिव्या घालतात त्यावेळी पहाणाऱ्या माय-बापांची देखील त्यांना थोडी देखील शरम वाटत नाही. हम करो सो कायदा काही महिन्यापुर्वी अगदी कंबरेखालची भाषा पत्रकार परिषदेत या माणसाने केली. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे मी म्हणजेच मी ही स्वतःची त्यांची समजुत खऱ्या अर्थाने पक्ष आणि नेतृत्व खड्यात घालण्यासारखीच म्हणावी लागेल. काही गोष्टीत त्यांच्या सहभागाचा वाटा असु शकतो. उदा. मधल्या काळात



महाविकास आघाडीची सत्ता आणणे किंवा मुळ भाजप-सेना युतीमध्ये फुट पाडून दुसऱ्याच्या दावणीला आपल्या नेतृत्वाला बांधणे.पण या साऱ्या कुरापती करताना मी म्हणजे कुणीतरी वेगळा ? त्यांची जीभ कधी कुणावर कशी घसरेल ? वास्तविक पहाता नैसर्गिक जीभ लवचीक असली तरी यांच्या जीभेला लकवा झाल्याप्रमाणे कारण पंतप्रधान नरेंद्र मोदीवरच टिका करणे असेल किंवा राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री कॅमेरे आपल्या बाजुने कसे झुकतील ? याची भुक त्यांना प्रचंड असते.राजकारण्यापेक्षा राऊत एक राजकिय नाटककारच वाटतात. परवा त्यांनी थुंकण्याचा जो किळसवाणी प्रकार केला जो देशातील आणि राज्यातील लोकांनी पाहिला त्यानंतर खरंच किळस आली हो या माणसाची. लक्षात घ्या, बालवाडीत शिक्षण घेणारा एखादा विद्यार्थी थुंकी आल्यानंतर आपल्या वर्ग शिक्षकाला विचारून बाहेर जावुन थुंकतो. कारण त्यांनासुद्धा बालवयापासुनच समाज काय म्हणेल ? याची नैतिकता असते. संजय राऊत थुंकले पण त्यांची थुंकी स्वतःच्या अंगावर पडली. कारण ती जागा थुंकण्याची नव्हती. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एक विचार निश्चित केला पाहिजे की आपण जेव्हा राजकिय भुमिका निभावतो तेव्हा वैचारिक, सुसंस्कृत काही विधायक प्रश्नावर चर्चा घडवुन आणायलाच हवी. सत्ताधाऱ्यांना नेहमीच टोमणे मारणे, कुणी चांगलं काम करत असेल त्याला नाव ठेवणे हा खरं राजकिय अधर्म म्हणावा लागेल. अनेकदा माणसाच्या नसनसात जर द्वेषच भरलेला असेल तर तिथे नाविलाज असतो. मग कदाचित मानसिकतेचा प्रश्न असेल, अहंमपणाचा प्रश्न असेल किंवा माझं श्रेष्ठत्व माझ्या नेत्यापेक्षाही मोठं असं दाखवण्याचंही काही प्रयत्न तशा प्रकारची मनात चलबील अवस्था असु शकते. तिकडे राहुल गांधी इकडे संजय राऊत, विदर्भात नाना पटोले आणि आता नव्याने शिल्लक राहिलेली शिवसेना वाचवण्यासाठी आलेल्या आमच्या सुषमा आक्का. या मंडळीचा आणि सुसंस्कृत विधायक राजकारणाचा कुठे थांगपत्ताच दिसत नाही. आपण जेव्हा दुसऱ्याकडे एक बोट करतो त्यावेळी चार बोट आपल्याकडे असतात हे तरी समजुन घ्यायला हवं. बरं राऊतांनी विरोधकावर टिका करणं एक वेळेस समजुन घेवु पण ते अजितदादा पवारांच्याही धरणावरच्या भाषेचा तिटकारा करतात. तर कधी राहुल गांधीच्या नेतृत्वात क्षमता नसल्याचे मान्य करतात. मग नेमकं काय करायचं ? आणि कसं बोलायचं ? हा विचार कुठंतरी निश्चित व्हायला हवा. रोज सामना हमरातुमरीचा राजकारणात करणं म्हणजे समाजात नव्या पिढीत जास्तीत जास्त वैरभाव निर्माण कसा होईल ? आणि नव्या पिढीतले राजकारणी त्याचं अनुकरण कसं करतील ? वैचारिक पातळीवर खरं तर हे विचारमंथन करण्यासारखं आहे. ते कुणाच्या नावाने थुंकले ? नंतर त्यांनी दाढेला काही तरी झाल्यासारखं सांगितलं. पुन्हा संध्याकाळी दाढ चांगलं बोलण्यासाठी लगेच दुरूस्त कशी झाली ? हा देखील संशोधनाचा विषय आहे. पण पावलोपावली खोटं बोलणं, लोकांची दिशाभुल करणं आणि राजकारणाचा तमाशा करणं एवढंच पात्र संजय राऊताना निभवायचं असेल तर आज ते पत्रकारांच्या कॅमेऱ्यासमोर थुकले उद्या कदाचित उभ्यानं लघुशंकेचं रिंगणं काढताना दिसले तरी त्यांना समजुनच घ्यावे लागेल. कारण आता तेवढंच बाकी आहे. नको ते शब्द त्यांच्या तोंडून ऐकायला मिळतात. किळसवाणी कृती देखील ते करतात. म्हणूनच या राज्यातील विचारवंत, ज्ञानवंत, प्रतिभावंत यांच्यासह सर्वसामान्य लोकांच्या मनात अशा घाणेरड्या राजकिय संस्कृतीचं अनुकरण करणाऱ्या लोकप्रतिनिधीमुळे संतापाची लाट निर्माण होताना दिसते.

# भारत बनणार टेस्ट मे बेस्ट ?

आधुनिक केसरी

आजपासून म्हणजे ७ जून पासून इंग्लंडच्या ओव्हल मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात विश्व कसोटी चॅम्पियनशिपचा ( wtc ) अंतिम सामना रंगणार आहे. ही कसोटी जिंकणारा संघ कसोटीत अजिंक्य ठरणार आहे म्हणजे एकप्रकारे ही कसोटीच्या विश्वचशकाची फायनल आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या अंतिम कसोटीत पोहचलेले दोन्ही संघ म्हणजे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांनी मागील वर्षभरात कसोटीत अप्रतिम कामगिरी करत कसोटी क्रमवारीत पहिले व दुसरे स्थान मिळवून अंतिम फेरीत धडक मारली. भारताने सलग दुसऱ्या वर्षी कसोटीच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. मागील वर्षीही भारताने अंतिम फेरीत स्थान मिळवले होते मात्र न्यूझीलंडकडून पराभव स्वीकारावा लागल्याने कसोटी अजिंक्यपदापासून वंचित राहावे लागले होते.

आता यावर्षी तरी भारत ही कसोटी जिंकून कसोटी अजिंक्यपद मिळविल अशी आशा देशातील १४० कोटी जनतेला आहे. कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचलेले दोन्ही संघ तुल्यबळ आहेत. ऑस्ट्रेलियाचा संघ तगडा असला तरी भारताचा संघ काही कमी नाही. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रात भारतीय संघ मजबुत आहे. भारताची फलंदाजी विश्वस्तरीय आहे. भारताचे सलामीचे फलंदाज कर्णधार रोहित शर्मा आणि फॉर्म मध्ये असलेला युवा शुभमन गिल हे दोघेही संघाला चांगली सलामी देऊ शकतात. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर येणारा चेतेश्वर पुजारा हा इंग्लंडमध्येच होता त्याने कौंटी स्पर्धेत खोऱ्याने धावा काढल्या आहेत. चौथ्या क्रमांकावरील विराट कोहली तर जगातील सर्वोत्तम फलंदाज असून तो तुफान फॉर्ममध्ये आहे त्यानंतर अनुभवी अजिंक्य रहाणे येईल तो देखील फॉर्ममध्ये आहे. यष्टीरक्षक म्हणून के एस भरत आणि ईशान किशन यापैकी कोणाची वर्णी लागेल हे पहावे लागेल मात्र कोणाचीही वर्णी लागली तरी ते देशासाठी सर्वोत्तमच कामगिरी करतील. गोलंदाजांमध्ये मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि उमेश यादव ही तिकडी ऑस्ट्रेलियन फलंदाजांची दांडी गुल करेल तर फिरकीची जबाबदारी अनुभवी रवींद्र जडेजा पार पाडेल. उर्वरित एका जागेवर अनुभवी ऑफ स्पिनर रवीचंद्रन अश्विन आणि अष्टपैलू शार्दूल ठाकूर यापैकी कोणाची वर्णी लावायची याचा निर्णय संघ



व्यवस्थापन खेळपट्टी पाहून घेतील. एकूणच या अंतिम कसोटीसाठी भारताचा संघ परिपूर्ण असून प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून खेळ केला आणि मागील वर्षी झालेल्या चुका टाळल्या तर भारत कसोटीत अजिंक्य ठरू शकतो. भारताच्या विरोधात जाणाऱ्या दोनच गोष्टी आहेत त्यातील एक म्हणजे ही कसोटी इंग्लंडमध्ये आहे त्यातही ओव्हलवर जिथे भारताचा रेकॉर्ड चांगला नाही. तिथे सध्या थंड हवामान आहे भारताच्या उष्ण हवामानातून एकदम थंड हवामानात स्वतःला ऍडजस्ट करणे खेळाडूंसाठी मोठे आव्हान असेल अर्थात भारताचे सर्व खेळाडू अनुभवी असून जवळपास सर्वच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे त्यामुळे त्यांनी जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर इंग्लंडमध्येही भारतीय खेळाडू आपल्या गुणवत्तेचा डंका पिटतील. भारताच्या दृष्टीने दुसरी महत्वाची समस्या ही आहे ती ही की या संघातील पुजारा वगळता इतर सर्व खेळाडू आयपीएलमध्ये खेळत होते. जवळपास दोन महिने हे खेळाडू वीस षटकांच्या मर्यादित क्रिकेटमध्ये खेळत होते. आता त्यांना थेट पाच दिवसांच्या कसोटीत खेळायचे आहे. टी २० सारख्या छोट्या फॉरमॅटमधून थेट कसोटी सारख्या मोठ्या फॉरमॅटमध्ये खेळणे हे देखील संघासाठी मोठे आव्हान असेल अर्थात भारताचे सर्व खेळाडू हे व्यावसायिक आहेत त्यामुळे ते या समस्येवर देखील मात करून भारतच टेस्ट मध्ये बेस्ट आहेत हे जगाला दाखवून देतील. संघातील सर्व खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतच टेस्ट मध्ये बेस्ट आहे हे सिद्ध होईल. भारतीय संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप ( wtc ) च्या अंतिम सामन्यासाठी मनापासून शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सिद्धी महातोलेच्या नृत्याने जिंकली मने



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अभिजात पारंपरिक नृत्यांतील सौंदर्य रसिकांपुढे उलगडून दाखवणे हे कौशल्य आहे. पुराणकाळातील कथांचा आजच्या आधुनिक समाजाशी सांगड घालण्याचे कौशल्य सिद्धी प्रभंजन महातोले हिने लीलया पेलले. भरतनाट्यम नृत्यातील अरंगेतरम ही महत्त्वाची पायरी तिने पार केली. रसिकांनीही तिच्या सादरीकरणाला भरभरून दाद दिली.
एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात रविवारी सिद्धीचे अरंगेतरम झाले. श्री माता निर्मलादेवी नृत्यझंकार अकादमीतील अरंगेतरम करणारी ती 70 वी शिष्या ठरली. शहरात शास्त्रीय नृत्याचे पहिले बीज रोवणाऱ्या स्व. मीरा पाऊसकर यांना अभिवादन करून सोहळ्याची सुरुवात झाली. सध्या अकादमीची धुरा सांभाळत असलेल्या गौरी पाऊसकर यांच्या मार्गदर्शनात सोहळ्याचे नियोजन केले होते. नटराजाची भव्य मूर्ती अन् केळीचे खांब अशी नेपथ्यरचना लक्षणीय ठरली. या सोहळ्यात घुंगरांचे मंजूळ बोल हळूहळू रसिकांच्या हृदयाचा ठाव घेणारे ठरले. सिद्धीने गणेश वंदनेने सादरीकरणाला सुरुवात केली. तिच्या मनमोहक अदा, चपळाईपूर्ण नृत्याने सगळेच भारावून गेले. हस्तमुद्रा, पदन्यासाच्या संचलनातील हुकूमत दाद मिळवून गेली. सरस्वती कौत्वकम विलक्षण नजाकतीने तिने पेश केले. भावाभिनयाचे तिचे कौशल्य रसिकांना खिळवून ठेवत होते. जतिस्वरम, वर्णम, तिल्लाना, मंगलम असा हा नृत्याचा प्रवास रसिकांसाठी स्मरणीय ठरला. यावेळी अनुराधाजी जालनावा, गौरी पाऊसकर, मयुरी कुलकर्णी यांचा सत्कार प्रिया महातोले यांच्याकडून करणयात आला. यावेळी मानसी नायर, डॉ.प्रो.जयंत शेवतेकर, अजय शाह, संतोष कावळे पाटील, श्रीराज नायर, दयाराम बसैय्ये,डॉ.अजित हजारी, डॉ.प्रो. वैशाली देशमुख, साध्वी नित्यबोधा, प्रेषित रूद्रवार, शितल देशपांडे, डॉ.प्रो. रेखा शेळके, आय.व्ही.आर.प्रसाद, श्वेता प्रसाद, श्रीधराचार्य, चंदरराव, उमा वेंकटेश्वर, प्रदिद्वा, मुकुंद गोलटगावकर, प्रविण क्षत्रिय, बाळू म्हसके, गुरव, विक्रांत देशमुख व टिम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यांचा सत्कार प्रिया महातोले व प्रभंजय महातोले यांच्याद्वारे करण्यात आला.



# शिवराज्याभिषेकदिन श्रीरामनगर येथे साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती स्मारकाच्या जागेवर शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर पंचामृताने अभिषेक साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश देशमुख प्रमुख पाहुणे नारायण साबळे पाटील बेंद्रे आप्पा माजी उपमहापौर भाऊसाहेब वाघ अंकुश राजे चौधरी गंगाराम कापसे राहुल सावंत दशरथ मानवतकर विष्णू गुंठाळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक जागेवर ध्वजारोहण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पंचामृत अभिषेक करण्यात आला. कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून शिवव्याख्याते वैभव साबळे पाटील यांनी शिवराज्याभिषेक दिन या विषयावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी वल्लभ भंडारी शिवाजी वाघ साहेबराव पवार हिरालाल जयस्वाल सचिन वाघ भीमराव शेजुळ साहेबराव पवार नाना जगताप कारभारी वाहुळ आनंद बनकर शिवाजीराव काळे पाटील तुकाराम साबळे पंडित आंबेकर पत्रकार नाचन डोणगावकर, किरण गाडेकर दीपक मस्के, पांडुरंग साबळे अशोक गायकवाड रणजीत ठोंबळ हेमंत पाटील जगदीश मस्के सुभाष शुक्ला इत्यादींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन सुभाष पांडभरे पाटील यांनी केले. तर प्रस्ताविक संदिपान बापू काळे यांनी केले सूत्रसंचालन सुरेश हिवराळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अक्रूर वाघ यांनी मानले.

# आरपीआय आक्रमक; आरोपींना कडक शासन करा



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती काढली म्हणून संबंधित भीम सैनिकाची हत्या करणाऱ्या आरोपीना कडक शासन करा म्हणत आर पी आय आठवले गटातर्फे घटनेचा निषेध करत उपविभागीय अधिकारी वैजापूर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाच्या माध्यमातून आरोपीना कडक शासन करून मनुवादी विचार सरणी संपुष्टात आणली पाहिजे या करता प्रयत्न करावे अशी मागणी देखील करण्यात आली आहे. याप्रसंगी आर पी आय तालुकाध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, संजय उबाळे, श्रीकांत जाधव, सागर त्रिभुवन, प्रवीण गायकवाड, बाबासाहेब निकम, किशोर पठारे, प्रवीण शिंदे व अरुण कसबे आदींची उपस्थिती होती.



नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

# नुकसानग्रस्त फळबागांचे पंचनामे करण्याच्या आमदार लोणीकर यांच्या प्रशासनास सूचना

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** मंठा व जालना तालुक्यातील फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून आष्टी परिसरातील अनेक गावात असलेल्या केळीच्या बागा उध्वस्त झाल्याची व्यथा शेकडो शेतकऱ्यांनी माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे मांडताच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालना, जिल्हाधिकारी जालना, तहसीलदार मंठा व परतुर तसेच अनेक प्रशासनातील अधिकारी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत कशी मिळवून देता येईल याबाबत चर्चा केली असून तातडीने प्रत्येक फळबागातदार शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पंचनामा करण्याचे सूचना प्रशासनाला केल्या आहेत. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी खचून न जाता भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष तसेच पदाधिकारी कार्यकर्ते किंवा माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा लवकरच आपण मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर हा विषय मांडून नुकसान ग्रस्त फळबागातदार शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# अभिनयातील वात्सल्यमूर्ती हरवली



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**मराठी चित्रपट विश्वात आपल्या अभिनयानं वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सुलोचना दीदी अर्थात सुलोचना लाटकर यांचे नुकतेच वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. शनिवारी दीदींची तब्बेत ढासळली. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं होतं. याआधी मार्च महिन्यातही त्यांची प्रकृती बिघडलेली होती. त्यांना श्वास घेण्यास अडचण येत होती. सुलोचना दीदींचे जाणे हे मराठी प्रेक्षकांच्या मनाला चटका लावून जाणारे आहे. केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपट विश्वात देखील त्यांनी आपल्या अभिनयानं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले होते.**

त्यांचा सदैव हसरा चेहरा आणि त्या सात्विक चेहऱ्यावरील तेज चाहत्यांसाठी मोठी समाधानाची बाब होती. त्यांच्या जाण्यानं चाहत्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हिंदी-मराठी सिनेसृष्टीचा प्रदीर्घ काळ ज्यांनी 'याचि देही याचि डोळा' जगला अशा फार थोड्या दिग्गज कलाकारांपैकी सुलोचना दीदी एक. त्यांचा जन्म कोल्हापूरमधल्या खडकलाट गावी ३० जुलै १९२८ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव तानीबाई आणि वडिलांचे नाव शंकरराव दिवाण होते. बालपणी गावातील तंबूमध्ये दाखविले जाणारे अनेक चित्रपट त्यांनी त्याकाळी पाहिले आणि त्यांच्या मनात याच काळात अभिनयाची व कलेची आवड रुजली. लहानपणीच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या मावशी बनुबाई लाटकर यांनी केले. या मावशीला त्यांच्याबद्दल एवढा विश्वास होता की ही मुलगी नाव काढणार! त्यामुळे तिच्याबरोबर आपल्या गावाचं नावही मोठं होऊ दे, म्हणून त्यांनी तिचं आडनाव लावलं 'लाटकर अर्थात लाटकर हे आडनाव ना त्यांच्या माहेरचं नाव आहे ना सासरचं. ते नाव आहे त्यांच्या गावाचं! सुरूवातीला मास्टर विनायक यांनी आपल्या 'प्रफुल्ल पिक्चर्स' या संस्थेत सुलोचना यांना १९४३ साली 'ज्यूनियर आर्टिस्ट' म्हणून नोकरीस घेतले. याच साली प्रदर्शित झालेल्या 'प्रफुल्ल पिक्चर्स'च्या 'चिमुकला संसार' या चित्रपटातून सुलोचनाजींनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी पहिल्यांदा छोटीशी भूमिका साकारली. याच सुमारास त्यांचा परिचय लता मंगेशकर यांच्याशी झाला व त्यांनी सुलोचनादीदींना या क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सुरुवातीच्या काळात त्यांना भालजी पेंढारकर यांचं मार्गदर्शन लाभलं होतं. त्यांची भाषा ग्रामीण ढंगाची होती. त्यांची भाषा शुद्ध नव्हती. त्यांच्या बोलण्याची थट्टा व्हायची. त्यामुळे त्यांना बरेचदा टीका सहन करावी लागत असे. भालजी पेंढारकर यांनी त्यांची भाषा सुधारावी म्हणून एक संस्कृत मासिक त्यांच्याकरता लावले. ते वाचणे हे चांगलेच क्लिष्ट काम होते. पण त्याबद्दल तक्रारीचा चकार शब्द न काढता सुलोचनाबाई चिकाटीने





त्या भाषादिव्यातून गेल्या. त्यांची थट्टा व नक्कल करणारे महाभाग 'पारिजतक'च्या चित्रीकरणाच्या वेळी सुलोचनाबाईंना संस्कृतप्रचुर संवाद अस्खलितपणे बोलताना पाहून थक्क झाले. भालजींनीच त्यांचे विशाल, भावपूर्ण डोळे पाहून त्यांचे नामकरण 'सुलोचना' असे केले व हेच नाव पुढे चित्रपटसृष्टीत रुढ झाले. शिक्षण अवघं चौथीपर्यंतच झालं असलं तरी सुलोचनादीदींनी चित्रपटसृष्टीत आपले नाव सुवर्णाक्षरात लिहिले आहे. सुमारे सात दशके आपल्या अभिनयाने मनोरंजन करणाऱ्या सुलोचना लाटकर ह्या मनोरंजन जगतात आणि चाहत्यांमध्ये सुलोचना दीदी या नावाने परिचित होत्या. त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीवर आपल्या अभिनयाची छाप पाडली होती. त्यांनी, मराठा तितुका मेळवावा, मोलकरीण, बाळा जो जो रे, सांगते ऐका, सासुरवास, वहिनीच्या बांगड्या अशा अनेक मराठी सिनेमांमध्ये काम केले होते. मोलकरीण आणि एकटी या सिनेमात दीदींनी साकारलेली सोशिक आईची भूमिका तर लाजवाबच. भाऊबीज' या चित्रपटासाठी 'चाळ माझ्या पायात' ही सुलोचनादीदींनी सादर केलेली लावणी आणि 'मराठा तितुका मेळवावा' या चित्रपटासाठी त्यांनी साकारलेली जिजाबाईंची भूमिका तर इतकी लक्षवेधी ठरली की, प्रेक्षकांच्या मनात त्यांच्याविषयी असलेले आदराचे स्थान अधिकच बळकट झाले. मराठी चित्रपटसृष्टी गाजवल्यानंतर त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीतही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. हिंदी चित्रपट सृष्टीत सहकलाकार म्हणून पृथ्वीराज कपूर यांच्या बरोबर अभिनयाची सुरुवात करून पुढे राजकपूर, शम्मीकपूर, शशीकपूर या कपूर घराण्याच्या दुसऱ्या पिढीबरोबर आणि नंतर, कपूर घराण्याच्या तिसऱ्या पिढीच्या रणधीर कपूर, ऋषी कपूर, गीता बाली, बबिता, नीतू सिंग यांच्या बरोबरही त्यांनी हिंदी

चित्रपटातील काळ गाजवला. त्यांचा मोतीलाल यांच्या बरोबरचा 'मुक्ती' हा चित्रपट गाजला. याशिवाय त्यांनी आये दिन बहार के, कटी पतंग, नाटक, चिराग, संबंध अशा हिंदी सिनेमांमध्ये अभिनय केला होता. सुलोचना दीदी यांची कारर्किद अत्यंत मोठी असून त्यांनी २५० मराठी आणि १५० हून अधिक हिंदी सिनेमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलाय. त्यामुळे त्यांचा चाहता वर्ग मोठ्या प्रमाणावर होता. विशेष म्हणजे सुलोचना दीदी यांनी अनेक चित्रपटांमध्ये आईची भूमिका केली आहे. दिलीप कुमार आणि धर्मेंद्र यांच्यासोबतही सुलोचना दीदी यांनी चित्रपटांमध्ये काम केले आहे. भालजी पेंढारकर यांच्या दिग्दर्शनाच्या तालमीत तयार झालेल्या सुलोचनाबाईंची प्रतिमा लाखो चित्रपट रसिकांच्या मनात चित्रपटातील आई अशीच आहे. सोज्वळ, शांत आणि घरंदाज भूमिका त्यांनी पडद्यावर जिवंत केल्या. त्यांना उपजत लाभलेले सोज्वळ सौंदर्य आणि अतिशय भावदर्शी चेहरा या बाबींमुळे त्यांना चरित्र अभिनेत्रीच्या अप्रतिम भूमिका सादर करण्याची संधी मिळाली. प्रेमळ सोशीक आई, सालस बहीण, समजूतदार वहिनी या त्यांनी सादर केलेल्या व्यक्तिरेखा कसदार अभिनयासाठी वाखाणण्यात आल्या. शालीनता, सात्त्विकता व भूमिकेशी समरस होण्याची वृत्ती, अपार कष्ट करण्याची मानसिकता, अपयशाला सामोरे जाण्याचे धैर्य या त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांच्या व्यक्तिरेखा चित्रपटसृष्टीत अजरामर झाल्या. त्यांना चित्रपटनिर्मितीचीही इच्छा होती. दिग्दर्शन करावंसंही त्यांना वाटत होतं. ते शिकायला तेवढा वेळ मात्र मिळाला नाही. मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीला आपल्या सशक्त अभिनयाचं दर्शन घडवणा-या सुलोचनाजींना आजपर्यंत शेकडो पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. १९९९ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. त्याशिवाय २००४ मध्ये फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. तर २००९ मध्ये महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रभूषण या राज्याच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होते. दीदींच्या जाण्यानं चाहत्यांना शोक अनावर झाला असून सोशल मीडियावर त्यांना चाहत्यांनी आदरांजली वाहिली आहे. याशिवाय हिंदी, मराठी सिनेविश्वातील सेलिब्रेटींनी देखील दीदींच्या निधनानंतर शोक व्यक्त केला आहे. सुलोचना दीदींच्या जाण्याने मराठी चित्रपटसृष्टीच्या फार मोठ्या वाटचालीचा शेवट झाला आहे.

# रुबाबदार राजमुकुटात छत्रपती शिवराय!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी "याचि देही, याचि डोळा" अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी!**

रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी कित्येक महिन्यांपासून सुरु होती. या सोहळ्याच्या नऊ दिवस आधी या राज्याभिषेकाशी संबंधित अनेक विधी पार पडले. दि.६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरू झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. गळ्यात फुलांच्या माळा इकडून तिकडे व तिकडून इकडे रूळत होत्या. राज्याभिषेकात महाराजांचे अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे, हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब व दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचकावर छत्रपती शिवाजी महाराज बसले, शेजारी रेशमी उपरण्याला भरजरी साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचकावर, तर बाल शंभूराजे नटूनथटून थोडेसे मागे बसले होते. अष्टप्रधान मंडळातील आठही प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर त्या जलकुंभांनी छ.शिवाजी महाराजांवर अभिषेक झाला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणि आसमंतात विविध मंगल सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर छ.शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक रुबाबदार राजमुकूट घातला. आपली ढालतलवार आणि धनुष्यबाण यांची पूजा केली. या शुभ मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात रुबाबात प्रवेश केला. राज्यभिषेकाचे दालन हिंदू परंपरेनुसार ३२ शुभशकुन चिन्हांनी सजवलेले होते. सभासदबखर म्हणते त्याप्रमाणे ३२ मण सोन्याचे भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते. छत्रपती शिवाजीराजे सिंहासनावर दिमाखात आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. प्रजेनी महाराजांना शुभाशीर्वाद दिला. "छत्रपती शिवाजी महाराज की जय! छत्रपती शिवाजी महाराज की जय!!" असा जयघोष करण्यात आला. सोन्याचांदींची फुले उधळली गेली. विविध- ढोल, नगारे, तुतारी, सनई आदी तालवाद्यांच्या निनादाने व सूरवाद्यांच्या



मंगलसुरांनी आसमंत दुमदुमून गेले. आधीच ठरविल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून "धडाक धूम..." तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्यांची झालर ठेवत "शिवछत्रपती" म्हणून उच्चार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खुप धनधान्य भेट म्हणून दिले. त्यांनी एकून सोळा प्रकारचे महादान केले. त्यानंतर विविध मंत्रिगणांनी सिंहासनापुढे जाऊन राजांना अभिवादन केले. शिवछत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तिपत्रे, धन, घोडे, हत्ती, रत्ने, वस्त्रे, शस्त्रे दान केलीत. हे सर्व सकाळी आठ वाजेपर्यंत संपले. समारंभ संपल्यावर छत्रपती शिवाजी महाराज पहिल्यांदाच एका देखण्या घोड्यावर स्वार होऊन जगदीश्वराच्या मंदिराकडे गेले. तिकडून हत्तीवर स्वार होऊन त्यांची मिरवणूक रायगडावर निघाली. इतर दोन हत्तींवर जरीपटके आणि भगवे झेंडे घेऊन सैन्यांचे प्रतिनिधी होते. सोबत अष्टप्रधान मंडळ आणि इतर सैन्यदळ होते. रायगडावर ही मिरवणूक जात असताना सामान्य जनांनी फुले, चुरमुरे उधळले; दिवे ओवाळले. रायगडावरील विविध मंदिरांचे दर्शन घेऊन राजे महालात परतले.

राज्याभिषेकाच्या दिवसापासूनच स्वराज्यातील राजपत्रांवर "क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती" असे नमूद करणे सुरु झाले. शिवरायांनी राज्याभिषेकाच्या दिवसापासून नवीन शक सुरु केले आणि छत्रपती शिवराय शककर्ते राजे झाले. याच शकाला शिवराज्याभिषेक शक संबोधले जाते. शिवरायांनी आपल्या स्वतःच्या स्वराज्यात स्वतःच्या नावाची नाणी पाडली. तांब्याच्या पैश्याला- शिवराई व सोन्याच्या पैश्याला- शिवराई होन म्हटले जाऊ लागले. स्वराज्यात अधिकृतरीत्या शिवरायांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. अनेक सरदार व मंत्री यांना स्वराज्याची कामे आणि जबाबदाऱ्या वाटून दिल्या. रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी "याचि देही, याचि डोळा" अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी!

!!छत्रपती शिवाजी महाराज की जय !!

# महान अभिनेत्रीला मुकलो!

आधुनिक केसरी

मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेत्री सुलोचना दीदी म्हणून अशी ओळख असलेल्या महान अभिनेत्री सुलोचना लाटकर यांनी वयाच्या ९४व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.त्यांचे निधन मनाला चटका लावून गेले.आपण एका महान अभिनेत्रीला मुकलो आहोत.

त्यांचा जन्म ३०जुलै १९२८ रोजी झाला. १९४३मध्ये अभिनय क्षेत्रात त्यांनी पदार्पण केले. मराठी आणि हिंदी अशा चित्रपटांमध्ये चरीत्र अभिनेत्री म्हणून काम केले.अभिनय क्षेत्रात भालजी पेंढारकर यांचे सुलोचना दिदींना मार्गदर्शन लाभले. लहाणपणीच आई वडीलांच छत्र हरपलं त्यांना पहीली भुमिका मिळाली चिमुकली संसारमध्ये सुलोचना दीदींनी २००वेळा आईची भुमिका पडद्यावर साकारली.

आपल्या नैसर्गिक अभिनयाने रसिकांची मने जिंकली.एक सोज्वळ, सालस, प्रेमळ,अशी आई त्यांनी साकारली. साठ,सत्तर ते ऐंशीच्या दशकात त्यांनी आईच्या भुमिका साकारल्या. प्रेक्षकांच्या हृदयावर त्यांनी अधिराज्य गाजवले. एक आई म्हणून त्यांनी आपला ठसा उमटविला. १९४९ मध्ये सासुरवास या मराठी चित्रपट सृष्टीत पाऊल ठेवले.१९५३ मध्ये वहीनीच्या बांगड्या या चित्रपटाने इतिहास घडवला. हिंदी चित्रपटांमध्ये देव आनंद,सुनील दत्त,राजेश खन्ना, अमिताभ बच्चन या सुपरस्टार अभिनेत्यांची आईची भुमिका साकारल्या.तब्बल २५०हुन अधिक मराठी व हिंदी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. मराठी चित्रपटांमध्ये वहीनीच्या बांगड्या, मीठ भाकर,धाकटी जाऊ,सांगत्ये ऐका , मोलकरीण, साधी माणसं, बाळा जो जो रे, सासुरवास,मराठा तितुका मेळवावा, चित्रपट गाजले तर हिंदी चित्रपट सृष्टीत कटीपंतग, जॉनी मेरा नाम, कोरा कागज, मुकद्दर का सिकंदर,जोशीला, प्रेम नगर,मेरे जीवन साथी, चिराग, हिम्मतवाला,अशा दर्जेदार चित्रपटात दर्जेदार भुमिका साकारल्या.

संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी,
ता.श्रीगोंदा , जिल्हा, अहमदनगर

त्यांनी आईच्या भुमिकेला एक वेगळी उंची मिळवुन दिली.त्यामुळेच त्या प्रेक्षकांच्या मनात घर करून राहील्या.त्यांना,सर्वोत्कृष्ठ अभिनेत्री ,व्ही शांताराम,चित्रभुषण, लाईफ टाईम अचिव्हमेंट, फिल्मफेअर, पद्मश्री, महाराष्ट्र भुषण, पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.सुलोचना दिदींच्या निधनाने आपण एका महान अभिनेत्रीला मुकलो आहोत.मराठी , हिंदी चित्रपट सृष्टीची खुप मोठी हानी झाली आहे.ती कधीही भरून येणार नाही. तमाम रसिक प्रेक्षकांतर्फे सुचोचना दिदीनां विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.



# छत्रपती शिवराय यांच्या राज्याभिषेकाचे वर्णन



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा प्रसंग होता. राज्याभिषेकावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले.छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शालिवाहन शके १५९६ म्हणजेच ६ जून १६७४ ला स्वतःस राज्याभिषेक करून घेतला आणि एका सार्वभौम राज्याच्या जयघोष केला. कित्येक वर्षे गुलामीत राहिलेल्या मराठी मुलुखात नवचैतन्याचा सोहळा पार पडला.छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या शिवराज्याभिषेकाची तयारी कितीतरी महिने अगोदर सुरू झाली होती.**

राज्यभिषेकासाठी निश्चित अशी कोणती परंपरा नव्हती. प्राचीन परंपरा आणि राजनीतीवरील ग्रंथातून काही विद्वानांनी प्रथा-परंपरांचा अभ्यास केला. शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून ब्राह्मणांना आमंत्रण देण्यात आले होते. लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते. चार महिन्यांसाठी त्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच या सोहळ्याला उपस्थित झाले होते. प्रत्येक दिवशी एका धार्मिक विधीत आणि संस्कारात छत्रपती शिवाजी महाराज गढून गेले होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम आपली आई जिजाबाईंना नमस्कार केला. त्यांचे आशीर्वाद घेतले.
त्यानंतर महाराजांनी विविध मंदिरांत जाऊन देवदर्शन केले. देवके दर्शन घेतले, पूजा केली आणि ते रायगडाला १२ मे १६७४ला परत आले. तुळजापूरला भवानी मातेच्या दर्शनासाठी त्यांना जाणे शक्य नव्हते. म्हणून चार दिवसांनी ते प्रतापगडवरील प्रतिष्ठापना केलेल्या भवानीमाता देवीच्या दर्शनासाठी गेले. त्यावेळी सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली.त्यावेळी गागाभट्टांना ७००० होन तर इतर सर्व ब्राह्मणांना मिळून १७००० होन दक्षिणा दिली. दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे आणि लोखंड अशा सात धातूंनी वेगवेगळी तुला झाली. याशिवाय वस्त्र, कापूर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, गुळ, फळे इत्यादींच्या तुला झाल्या. ६ जून १६७४ला राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदैवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरू झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचावरछत्रपती शिवाजी महाराज बसले, शेजारी उपरण्याला साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचावर, तर बालसंभाजीराजे थोडेसे मागे बसले होते. अष्टप्रधानांतील आठ प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर ते जलकुंभांनी छत्रपती शिवाजीमहाराजांबर अभिषेक केला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणि आसमंतात विविध सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले.गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला.राज्यभिषेकाचे दालन हिंदू परंपरेनुसार ३२ शकुन चिन्हांनी सजवलेले होते. सभासदबखर म्हणते त्याप्रमाणे ३२ मण सोन्याचे ( १४ लाख रुपये मूल्य असलेले ) भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते.छत्रपती शिवाजी महाराज



सिंहासनावर आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. प्रजेनी महाराजांना आशीर्वाद दिला. 'शिवराज की जय', 'शिवराज की जय'च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीची फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून उच्चार केला. राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खूप धन भेट म्हणून दिले. त्यांनी एकून सोळा प्रकारचे महादान केले. त्यानंतर विविध मंत्रिगणांनी सिंहासनापुढे जाऊन राजांना अभिवादन केले. छत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तिपत्रे, धन, घोडे, हत्ती,रत्ने,वस्त्रे,शस्त्रे दान केली. अशा मोठ्या थाटात शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पूर्ण झाला. भारतीय इतिहासातील अलौकिक घटना म्हणून याकडे पाहिले जाते.

# राग, अहंकार जीवनातील विनाशाचे सूत्रधार



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**राग, अहंकार जीवनातील विनाशाचे सुत्रधार पण हेच मुख्य सुत्रधार आपल काही बिघडवू शकणार नाहीत असं नियोजन आपल्या जीवनात आपण केलं पाहिजे. जीवन पथ किती कठिण आहे या पेक्षा आपला मार्गदर्शक कोण आहे आणि आपण कोणाच्या आज्ञेत मार्गक्रमण करतोय हे जीवनात खूप महत्वाचं आहे. आपण वयाने किती लहान आहेत अथवा मोठे आहेत. ज्ञानी आहेत कि अज्ञानी आहेत गरीब आहेत कि श्रीमंत आहेत हे अजिबात महत्त्वाचे नाही. तर आपल्याला वेळोवेळी योग्य पद्धतीने नियंत्रित करू शकेल अशी सामर्थ्यवान शक्ति आपण आयुष्यात कमावली आहे का ? हिच आयुष्यातील शक्ती मिळवणं खुप गरजेचं असतं.**

पण व्यर्थ बाबी गोळा करण्यात स्वारस्य धन्यता मानणारी माणसं आपणं मग आपल्या कडुन अशा हिताकारक बाबी घडण सुद्धा तितकसं सोपं नसतं .हित सांगावं लागतं अहित न सांगता घडत . प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात एक सत्ता अधिसत्ता हि अशी असली पाहिजे कि जिथला शब्द अंतिम असेल त्या पुढे काहिच नाही .फक्त पालन अशी अवस्था निर्माण होणं आयुष्यसाठी हितकारक आहे.शिस्त हि जीवन घडवणारी बाब आहे पण चांगल्या बाबी चांगली शिस्त सहजासहजी लागतं नाही.वाईट गुण अवगुण अहितकारक बाबी ह्या काही प्रयत्न न करता सुद्धा लागतात पण चांगले गुण सद्गुण हितकारक बाबी वारंवार सांगुन सुद्धा लागत नाहीत हे वास्तव आहे.आपण कोणाच्या नियंत्रणात आहेत त्या नुसार आपल्याला जीवनाची दिशा आणि मार्गक्रमण ठरत असतं.जीवनातील अनेक अपेक्षित अनपेक्षित अपघात हे नियंत्रण मुक्त आचरणाचे पारीतोषिक असतं .मानवी मन हे अनियंत्रित असतं ते कधी काय घडवुन आणेल हे कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. महणुन आपलं मन नियंत्रित ठेवण हे खुप गरजेचं आहे. नियंत्रण मुक्त जीवन हिच प्रत्येक जीवाची अपेक्षा असते . वातावरण आणि विज्ञान युग हि अपेक्षा किती योग्य किती अयोग्य हे ठरवणं जरी कठिण असलं तरी सुद्धा ज्याला आपलं आयुष्य उत्तम रितीने पुर्ण व्हावं अशी अपेक्षा इच्छा असते . त्याने जीवनात एक पथ्य पाळा आणि पथ्य पाळता आलं तर आयुष्यातील कितीही मोठा अपघात टाळता येऊ शकतो आणि हे पथ्य म्हणजे उत्तम हितकारक मार्गदर्शकांचा आदेश शब्द, सुचना जी काही असेल ती विना अट शर्त जो पालन करेल त्याच हित झाल्याशिवाय रहात नाही.आपल हित आपल्याला जोपासता आल पाहिजे.बिना ब्रेकची गाडी जेव्हा सुसाट धावेल तेव्हा ती काही तरी विनाशकारी पराक्रम घडवे पर्यंत थांबणार नाही.कारण या गाडीला गती नियंत्रण करण्यासाठी काही व्यवस्था उपलब्ध नाही आहे. मानवी मनाचं पण तसंच आहे आपलं मन कधी कोणी कोठुन कोठे धावेल याचा भरोसा नाही. अनियंत्रित मन हेच जीवनातील अनेक अपघातांना कारणीभुत असतं आपण आपलं जीवन विना अपघात पुर्ण व्हावं असं आपल्याला वाटत असेल तर आपल्या मनावर नियंत्रण स्थापित करणारी यंत्रणा आपण अवलंबली पाहिजे.विना प्रश्न उत्तर आपण आज्ञा पालन करू असं स्थान जीवनात मिळालं निर्माण झाल असल तर आपलं खुप मोठं हित साध्य झालं असं समाजाव.दैनंदिन जीवनात येणाऱ्या विविध संकटापासून आपला स्वतःचा प्रभावी बचाव करण्यासाठी अथवा या मधुन योग्य मार्ग काढत स्वहित होण्यासाठी एक सत्ता आपल्या जीवनात असली पाहिजे जिथे आपल्या मनाचे काही चालणार नाही अशी सत्ता निर्माण करण्यात आपण यशस्वी झालो तर आपलं जीवन हे नक्कीच यशस्वी झाल अस समजा .जीवन तसं पाहिलं तर खूप रंजक आहे आपण स्त्री कि पुरूष आहेत या पेक्षा हि एक जीव म्हणून आपलं अस्तित्व यशस्वी होण्यासाठी विना अडचण मार्ग निघण्यासाठी आपल्या आयुष्यात एक स्थान असं असलं पाहिजे कि ते स्थान आपल्यासाठी सुप्रीम असं असेल तिथ प्रश्न नाही उतर नाही फक्त आज्ञापालन असं झालं तर जीवनातील अनेक गहण कठिण समस्या अगदी सहजपणे सुटतात . समस्या अडचणी आणि जीवन हे परस्पर पुरक आहेत. जीवनातील अनंत अशा अडचणी आणि विनाशकारी घटना नियंत्रित करण्यासाठी आपलं जीवन आपल्या नाही इतर कोणाच्या तरी आधिनस्त ठेवून आपण नामधारी राहिलं पाहिजे जेणेकरून आपल्या कडुन कोणत्याही प्रकारच अनुचित कर्म खात्रीने घडणार नाही

# माणसात देव पहायला शिका



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**सुधा मूर्ती या इन्फोसिस कंपनीच्या संचालक तथा विश्वस्त आहेत. तसेच त्या लेखक व सामाजिक कार्यकर्त्या आहेत. त्यांनी बरेच लिखाण केलेले आहे. गोष्टी माणसांच्या, वाईस अदरवाईज, तसेच डॉलर बहु, हे पुस्तके विशेष आहेत. त्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअर बी .ई .आहेत तसेच संशोधक शास्त्रज्ञ आहेत .त्यांना पद्मश्री तसेच पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आले आहे. माझ्या वाचण्यात आलेला सोशल मीडियावरील त्यांचा एक लेख सगळ्यांसाठी शेअर करीत आहे. देव-बीव सगळं झूट आहे..थोतांड आहे..'मेडिकल सायन्स' हाच खरा परमेश्वर आहे.. गेल्या ५० वर्षांत मेडिकल सायन्स मुळे जेवढे प्राण वाचले असतील,तेवढे देवाने लाखो वर्षात कुणाचे वाचवले नाहीत.**

मला कीव करावीशी वाटते त्या लोकांची जे 'ऑपरेशन थेटर ' च्या बाहेरही देवाची प्रार्थना आणि स्तोत्र म्हणत बसतात.."डॉकटर कामेरकरांच्या ह्या वाक्यावर, सभागृहात एकंच हशा उठला..डॉक्टर कामेरकर एका 'मेडिकल कॉन्फरन्स' मध्ये बोलत होते..डॉक्टर कामेरकर शहरातले निष्णात डॉक्टर.. त्यांना भेटायला पेशंट्सच्या रांगाच्या रांगा लागत असत.. कॉन्फरन्स संपली आणि डॉक्टर घरी आले.. वाटेतच त्यांच्या 'मिसेस' चा मेसेज होता कि "मी आज किटी-पार्टीला जात्ये..मुलं सुद्धा बाहेर गेली आहेत..जेवण डायनिंग टेबलवर काढून ठेवलंय.. घरी गेलात कि जेवा"...डॉक्टर घरी आले..हात-पाय तोंड धुवून जेवायला बसले..जेवण आटोपल्यावर लक्षात आलं,कि बरंचसं जेवण उरलंय..आता जेवण फुकट घालवण्यापेक्षा कुणाला तरी दिलेलं बरं.. म्हणून उरलं-सुरलेलं सगळं जेवण डॉक्टरांनी एका पिशवीत बांधलं आणि कुणातरी भुकेल्याला ते द्यावं म्हणून आपल्या बिल्डिंगच्या खाली उतरले..लिफ्ट मध्ये असताना, त्यांचंच भाषण त्यांच्या कानात घुमत होतं.."देव-बिव सगळं झूट आहे" हे वाक्य त्यांच्याच भाषणातलं सगळ्यात आवडतं वाक्य होतं..डॉक्टर कामेरकर हे पक्के नास्तिक..देव अशी कुठलीही गोष्ट,व्यक्ती,शक्ती जगात नाही ह्यावर ठाम..जगात एकंच सत्य..'मेडिकल सायन्स'..बाकी सब झूट है'..

डॉक्टर स्वतःच्याच विचारात बिल्डिंगच्या खाली आले..जरा इकडे-तिकडे बघितल्यावर रस्त्यात थोड्याच अंतरावर कुणीतरी बसलेलं दिसलं..ते त्या दिशेने चालू लागले..जवळ आले तेव्हा त्यांच्या लक्षात आलं कि एक मध्यम वयाची बाई,आपल्या एका १०/१२ वर्षांच्या मुलाला कवटाळून बसली आहे...

ते पोर त्याच्या आईच्या कुशीत पडून होतं..ती बाई देखील रोगट आणि कित्येक दिवसांची उपाशी वाटत होती..डॉक्टरांनी ती जेवणाची पिशवी, त्या बाईच्या हातात टेकवली..आणि तिथून निघणार, इतक्यात ती बाई,तिच्या मुलाला म्हणाली "बघ बाळा..तुला सांगितलं होतं ना..आज आपल्याला जेवाया मिळेल..देवावर विश्वास ठेव..हे बघ.. देव-बाप्पाने आपल्यासाठी जेवण धाडलंय"...हे ऐकल्यावर डॉक्टरांच्या तळ-पायाची आग मस्तकात गेली..ते त्या बाईवर कडाडले, "ओह शट-अप..देव वगैरे सगळं खोटं आहे..हे जेवण तुझ्यासाठी मी घेऊन आलोय..देव नाही..हे जेवण मी फेकूनही देऊ शकलो असतो..पण मी ते खाली उतरून घेऊन आलोय.. काय देव देव लावलंयस..नॉन-सेन्स.. "साहेब.. हे जेवण तुम्ही माझ्यासाठी आणलंत ह्यासाठी मी तुमची आभारी आहे..पण साहेब..देव हा माणसातच असतो ना.. ? आपणच त्याला उगीच चार हात आणि मुकुट चढवून त्याला फोटोत बसवतो..माझ्यासाठी तर प्रत्येक चांगलं कर्म करणारा माणूस,हा देवच आहे..आपण त्याला फक्त चुकीच्या ठिकाणी आणि चुकीच्या पद्धतीने शोधाया जातो एवढंच..माझ्यासाठी तुम्ही 'देव'च आहात साहेब..आज माझ्या लेकराचं तुम्ही पोट भरलंत..तुमचं सगळं चांगलं होईल... हा एका आईचा आशिर्वाद आहे तुम्हाला.. डॉक्टर कामेरकर, त्या बाईचं बोलणं ऐकून सुन्न झाले.. एक रोगट/भुकेलेली बाई त्यांना केवढं मोठं तत्वज्ञान शिकवून गेली होती..आणि ते ह्याच विचारात दंग झाले कि ही गोष्ट आपल्या कधीच डोक्यात कशी काय आली नाही.. ? चांगली कर्म करणारा प्रत्येक माणूस हा देवच असतो...चांगल्या कर्मातच परमेश्वर आहे.. चांगल्या माणसात देव आहे..प्रत्येक 'सत्कृत्यात' देव आहे हे आपल्या कधीच का लक्षात आलं नाही.. ? आपण 'देवावर विश्वास' ठेवा म्हणतो म्हणजे नक्की काय.. ? तर आपल्याला चांगली माणसं भेटतील,चांगली परिस्थिती निर्माण होईल ह्यावरच तो विश्वास असतो..डॉक्टरांनी एकदाच त्या बाईकडे वळून बघितलं..आपल्या भुकेल्या लेकराला ती माउली भरवत होती..त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून डॉक्टरांच्या डोळ्यांत पाणी आलं होतं.





## काही महत्त्वाचे प्रश्न

डॉ मला अलोपॅथी शुगर ची औषधी सोडायला भीती वाटते ? A-आज पर्यंत कधीच ऐकल नाही किंवा पाहिलही नाही आयुर्वेदाने मधुमेह अलोपॅथी सारखाच कंट्रोल होतो. B,-- अलोपॅथीचे डॉक्टर भीती घालतात किडनीफेल होइल पण साईडइफेक्ट अलोपॅथीला जास्त आहेत.

C-- आपलाच आपल्या आयुर्वेदावरचा अविश्वास, खरच आयुर्वेदाचा चमत्कार पहायचा असेल तर हे औषध घ्याच D-- कोणत्याही अलोपॅथी गोळ्या न घेता 100% मधुमेह नियंत्रण करता येतो 3 दिवसात फरक दिसतो अगदी अलोपॅथी सारखाच परत शुगर एकदम डाऊन होत नाही. E--खालील फायदे वाचा 1= सगळ्या वनस्पतीपासून निर्मित औषधी 2=अलोपॅथी सारखेच शुगर कंट्रोल करते 3=अलोपॅथी गोळ्या व इन्सुलिन बंद करता येते. 4=किडनी स्टोन वर तसेच किडनीला टॉनिक म्हणून उपयोग होतो, किडनी फेल होऊ देत नाही. 5= शिलाजीत मुळे मधुमेह आणि वजन जास्त असणाऱ्यांची लैंगीक शिथिलता नाहीशी होते. 6-= रात्री लघवीला उठणे बंद होते. 7= पोटऱ्या दुखणे बंद करते. 8=या मधील गुळवेल आणि सप्तकपी कॅन्सर पासून रक्षण करते, प्रतिकारशक्ती वाढवते. 9=जखमा लवकर बऱ्या होतात 10=मधुमेहात निर्माण होणाऱ्या न्यूरोलॉजिकल समस्या पण नाहीश्या होतात उदा. पाय बधिर होणे, दृष्टी कमी होणे, पायाची आग होणे, स्पर्श न समजणे,पाय गार वाटणे किंवा पडणे. 11= पथ्य आवश्यक आहे साबुदाणा, साखर, गूळ, मध,बिट, बटाटा 1 नंबरचे शत्रू आहेत, पोहे, मुरुरे भात जास्त शुगर असणाऱ्यांना वर्ज तसेच 1 तास पायी चालणे. चिंता करू नका, साखरेचा चहा पाजणाऱ्यास शत्रू समजा, दारू तंबाखू वाईटच आता हा शोध फार जुना आहे पण चिकाटी आणि धेर्याने औषधी घेतली तर सुदृढ जगणे होईल 100%. गुणवान औषधी आहेत पण प्रत्येक रुग्णाचा डोस वेगळा असू शकतो. कधीही संपर्क करा डॉ मनोज जोशी 9822341176 औरंगाबाद ( औषधे कुरियर केली जातील )1200 ते 1500 महिना खर्च येऊ शकतो. अपस्मार( फिट्स ) लक्षणे- झटके येऊन बेशुद्धी येणे, किंवा झटके न येता बेशुध्द होणे. कारणे- मेंदु दूरबल असणे, डोक्याला मार लागणे मानसिक व्याधी. पथ्य -वेळेवर जेवणे, झोपणे, गाईचे तुप, दूध, कोहळा, पेठा, बदाम खाणे अती तिखट, आंबट, खारट मसालेदार पदार्थ खाऊ नये. चिकित्सा- म्हाकल्यानं घृत, पंचगव्य घृत, स्मृतीसागर रस, दशमूलरीष्ठ, 2 थेंब रोज गाईचे तूप नाकात टाकणे, ब्राम्हशक्ती घ्यावी रोज गायत्री मंत्र म्हणावा,अथर्वशीर्ष रोज म्हणावे. - अवकबाहुक ( फ्रोझन शोल्डर ) लक्षणे- खांदा जखडणे, वेदना होणे, हात सरळ न होणे इत्यादी उपचार - बलादीशुद्ध तेल लावून मसाज करणे 7 ते 15 मिनिट . वेदनाहरलेप गोळीचा शिजवून लेप लावणे व्यायाम-हात गोल फिरवणे, दोरी ला पुली लावून हात वर करणे औषधी - पोटामधून त्रिफळा गुगुल2–2 जेवणानंतर चंद्रप्रभा वटी 2--2 जेवणानंतर बरे होईपर्यंत घ्यावे या व्याधिला बरे करण्यास चिकाटी खूपच आवश्यक आहे. जुलाब ( अतिसार ) वारंवार मलप्रवृत्तीस जावे लागणे. पथ्य-सबुदाणाची खीर, खसखस खीर, खावी औषधी-पोट दुखत असल्यास शंखवटी 2--2---2 रक्त पडत असल्यास कुटजघन वटी 2--2–2 जास्त प्रमाणात जुलाब असतील तर कुटज सुंठ कपरदीक भस्म समप्रमाणात 100 mg दर तासाला घ्यावे ibs किंवा इतर कारणांनी जुलाब असतील तर योग्य सल्ला घ्या. भूक न लागणे -म्हणजे च अग्निमांद्य, अरुची किंवा मंदाग्नी यावर घरगुती उपचार सुंठ मिरे पिंपळी 5ग्राम सम प्रमाणात आवळा 50 व शेदिमिठ 10 ग्राम एकत्र करून वाटण्या एवढ्या गोळया बनवून 2वेळ जेवणानंतर खावे पथ्य -- हलके,उकडलेले, गरम किंवा कोमट पाणी प्यावे, तोंडाला चव नसल्यास थोडीशी सुंठ चघळावी, भूक लागली की मुगाची खिचडी,ज्वारीची भाकरी, पालक , भोपळा, पडवळ, श्रावणघेवडा इ खावे वजन कमी असल्यास जेवणानंतर बल्यप्राश घ्यावे.

1-डॉक्टर,मला वारंवार किडनी स्टोन होतात ? ( गजानन खिल्लारे ) उत्तर- पाणी 5 लिटर कमीत कमी प्या नेहमी, पालक, टमाटे, कोबी दोन्ही बंद करा, रोज खोबरेल तेलाने पोटाची मालिश करा. 2- डॉ जोशी माझे 1 वर्षा पूर्वी 22 mm खडा असल्यामुळे किडनी स्टोन चे ऑपरेशन झाले आहे सोनोग्राफी मध्ये किंवा एक्सरे मध्ये काहीच दिसत नाही तरी माझे पोट दुखते अजूनही मला स्टोन असतील का किंवा परत होऊ ,शकतात का ? ( अविनाश कोशिरे ) उत्तर- किडनी स्टोन वारंवार होऊ शकतात , कधी कधी काही स्टोन आकाराने लहान असल्यास सोनोग्राफी किंवा एक्सरे मद्धे दिसत नाहीत पाण्याचं प्रमाण वाढवा किंवा योग्य आयुर्वेद डिग्री असणाऱ्या डॉक्टर कडून उपचार घ्या. गरोघर आयुर्वेद औषधीदेणारी फसवे वैदू खूप झाले आहेत आधा हकीम जान को खतरा हे लक्षात ठेवा

3-डॉ.- किडनी स्टोन मुळे किडनी खराब होऊ शकते का ? ( रणजित मदने ) जास्त दिवसाचे, 13 mm पेक्षा मोठया आकाराच्या स्टोन मुळे असे घडू शकते तसेच वारंवार स्टोन होण्याच्या शरीरा च्या स्वभावा मुळे काही वेळा किडनी खराब होऊ शकते याला उपाय म्हणजे वेळेवर आळस न करता ट्रीटमेंट घ्यावी 4-डॉ किडनी कोणत्या कोणत्या कारणाने फेल किंवा खराब होऊ शकते त्यावर आयुर्वेदीय उपचार आहेत का ? ( केशव गोराडे ) उत्तर किडनी स्टोन, पॉलिसिस्टिक किडनी,अनियत्रिंत मधुमेह,बीपी , पेन किलर घेण्याची जास्त सवय ,किंवा अलोपॅथी च्या काही मधुमेह व बीपी वरील काही प्रकारच्या औषधीनि( सगळ्या औषधी निनाही ) किडनी फेल किंवा खराब होऊ शकते. हो आयुर्वेदात किडनी स्टोन व किडनी फेल साठी उत्तम औषधी आहेत साधारण पणे 1 तो 2 महिन्यात उत्तम गुण दिसतो या साठी गोखरू, चंद्रप्रभा,श्व , असे बरेच औषधी आहेत पण हो डॉक्टरी सल्ला घेऊनच. डॉ. मनोज जोशी आयुर्वेद तज्ज्ञ 9822341176 औरंगाबाद तपासणी 300 ,औषधी खर्च 1500 ते 3500 महिना



डॉ. मनोज जोशी
9822341176

# परिपूर्ण आहार

आयुर्वेदाच्या संकल्पनेनुसार आपण जे अन्नग्रहण करतो त्यातूनच आपल्या तिन्ही प्रकृतीची शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक जडणघडण होत असते म्हणून आपण जे अन्नग्रहण करतो ते समतोल आणि परिपूर्ण असायला हवे. चावणे, चोखणे, चघळणे, शोषण, पिणे यासारख्या खाण्याशी निगडीत सर्व क्रिया कराव्या लागतील तो समतोल आहार, असाही समतोल आहाराचा एक निकष म्हणता येईल. आयुर्वेदात गोड, खारट, तुरट, कडू, तिखट आणि आंबट अशा सहा रसाचे वर्णन केलेले आहे. आपल्या रोजच्या आहारात या सहा ही रसाचा समावेश असायला हवा. उदा.- परिपूर्ण आहारामध्ये भात, वरण, चपाती, भाज्या, सलाड आणि ताक याचा समावेश असावा. दिवसातून किमान एकदा गरम अन्न खाणे पचनासाठी लाभदायक आणि महत्त्वाची मानले गेले आहे. परिपूर्ण भोजनात काय असावे याची ढोबळ रुपरेखा पुढील प्रमाणे देता येईल- 1 ) चटणी ओली किंवा सुखी अथवा लोणचे यामुळे जेवताना तोंडातील पाचक रसाचा श्राव वाढतो आणि शरीरातून घातक द्रव्य बाहेर टाकण्यास मदत होते. एका जेवणात एखादे दोन चमचे पुरेशी ठरतात. 2 ) सलाद कच्च्या किंवा उकडलेल्या भाज्या अथवा फळांचे साधे फोडणी दिलेले किंवा दह्यातले असावे. दह्यातले स्लॅड घेताना त्यात थोडी मिरे पूड टाकावी म्हणजेच दह्याच्या कफ कारक प्रवृत्तीचा उपशम होतो. 3 ) सुपाचे किंवा डाळीची किंवा साय, दूध आणि तांदळाची खीर याची जेवणाच्या सुरुवातीलाच सेवन केल्यास तोंडातील आणि जठरातील पाचक रसाचे प्रमाण वाढते.

4 ) भाज्या व कडधान्य, यातून जीवनसत्वे खनिज आणि प्राथिने मिळतात. पालेभाज्या आणि फळे अगदी बारीक चिरून योग्य प्रकारचे मसाले वापरून नीट शिजवणे अवश्य असते.

5 ) भात, खिचडी किंवा शेवया आणि चपात्या, पराठे जेवणाचा मुख्य घटक असतो त्यातून सर्वाधिक ऊर्जा मिळते.

6 ) वरण किंवा आमटीसाठी वापरलेले मूग तूर चने किंवा उडीद इत्यादी दाळी हा प्राथिनाचा चांगला स्त्रोत आहे , कडीचाही याच वर्गात समावेश होतो यामुळे भात, गहू याच्या पदार्थाचे पचन सरळ होते.

7 ) पापड तळणे ऐवजी भाजलेले आणि सोडा वगैरे नसलेले असतील तर पाचनशक्ती मंदावलेल्या रुग्णांना दिले तरी चालतात. वेगवेगळ्या



8 ) चवीच्या आणि वेगळ्या पद्धतीने बनवलेले पापड वेगवेगळे रस निर्माण करतात.

गोड पदार्थ, समाधान आणि भोजन परिपूर्ण असल्यास आनंद देतात. शिरा, बर्फी, पुडींग पुढील इत्यादी पदार्थाचा भोजनात समावेश करता येऊ शकतो. त्याने शरीराची शर्कराची आवश्यकता पूर्ण होते आणि शक्तीचा संचार होतो. हे जेवताना किंवा जेवण झाल्यावर ही खाल्ले तरी चालते.

9 ) ताक जेवणानंतर प्याले की पचन सुलभ होते पण आंबट ताक टाळावे, सायंकाळी ताक अथवा दही याचे सेवन कमीत कमी करावे. 10 ) मीठ सर्वसाधारणपणे ताटात वाढले जातेच पण त्याची अतिरेक टाळावा. कुटुंबातल्या सर्वांनी जेवण एकत्र घ्यावे जेवण संपल्यावर एकत्र उठावे. त्याने जेवताना निर्माण झालेल्या ऊर्जेचा संचय होतो.

**-डॉ. सुचिता सावळे, मो. 84858 03490**








# कपाशी बियाण्याचा काळा बाजार होऊ देणार नाही; बियाणे एमआरपी किमतीत विक्री करा : सभापती अवधूत नाना खडके

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकऱ्यांची पेरणी करण्यासाठीची तयारी सुरु झाली आहे. खरीपपूर्व मशागतीचे कामे पूर्ण झाल्याने पेरणीसाठी बियाणे खरेदीसाठीही शेतकऱ्यांची धावाधाव सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अंबड तालुक्यात कपाशी बियाण्याचा काळा बाजार खपवून घेतला जाणार नाही. आहे त्या आधारभूत किंमतीतच शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून देण्याची अधिकाऱ्यांची जवाबदारी आहे. अंबड तालुक्यात कपाशी बियाण्याचा काळा बाजाराला आळा घालून शेतकऱ्यांना एमआरपी किंमतीतच बियाणे उपलब्ध करून देण्याचे आश्वासन बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके यांनी पत्रकार परिषदेत केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष द्वारकादास जाधव,बाजार समितीचे संचालक केदार राठी, श्रीराम नागरे,जनाशेठ खरात,प्रकाश वायभट,पांडुतात्या शिंदे,आडत व्यापारी भीमराव नाना शिंगाडे यांच्यासह दुकानदारांची उपस्थिती होती. कपाशी बियाणांच्या कंपनीकडून जालना जिल्ह्यासह अंबड तालुक्यातील सर्व डीलरला कपाशी बियाण्यांचा खरीप हंगामाच्या तोंडावर पुरवठा करण्यात आला आहे. मात्र कबड्डी,संकेत,रेनबो, पंगा,7067 यांच्यासह काही निवडक बियाण्यांची मागणी जास्त असल्याने बाजारात या बियाण्यांचा काळाबाजार होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे ऐन हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना 853 रुपयांना मिळणारे बियाणे 1 हजार 200 ते 2 हजार 500 या दरात खरेदी करावे लागत असल्याने शेतकऱ्यांची डीलर तसेच बियाणे विक्रेत्याकडून जाणून बुजून आर्थिक पिळवणूक केल्या जात आहे. ही बाब अंबड तालुक्यात खपवून घेतली जाणार नसल्याचे बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. अंबड तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांकडून कपाशी बियाण्याची बॅग शेतकऱ्यांना 853 रुपयांना मिळणे अपेक्षित असतांना देखील बियाण्यांचा काळ्या बाजार करून हीच बॅग शेतकऱ्यांना 1 हजार 200 ते 2 हजार 500 रुपयांना विकली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याला रोखण्यासाठी जिल्हा कृषी अधिकारी कापसे यांच्याकडून अपडेट घेऊन बियाण्यांचा संपूर्ण स्टॉक हा स्टॉप सेल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कृषी विभागाचा कर्मचारी नियुक्त करूनच बियाणे विक्री करण्याच्या देखील सूचना देण्यात आल्या आहेत.

अतिवृष्टी आणि अवकाळी पावसांमुळे शेतकरी अगोदरच संकटात सापडलेला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची मदत अद्यापही काही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. उर्वरित शेतकऱ्यांना देखील शासकीय मदत मिळेल. कृषी सेवा केंद्र आणि किरकोळ बियाणे विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांच्या असहायतेच्या फायदा घेऊ देणार नाही.



तालुक्यातील सर्व डीलरला कपाशी बियाण्यांचा खरीप हंगामाच्या तोंडावर पुरवठा करण्यात आला आहे. मात्र कबड्डी,संकेत,रेनबो, पंगा,7067 यांच्यासह काही निवडक बियाण्यांची मागणी जास्त असल्याने बाजारात या बियाण्यांचा

अंबड तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवाना बाजार समितीसह तालुक्यातील सर्व बियाणे विक्रेत्यांकडे बियाणे उपलब्ध झाले आहेत . कोण्या एकाच कपाशी बियाणांची दुकानदाराला मागणी करू नका . मार्केटमध्ये उपलब्ध झालेले सर्व बियाणे चांगल्या प्रतीचे आहे . 853 रुपयांपेक्षा जास्त दराने बियाणांची खरेदी करू नका . जास्त दराने पैसे कृषीप्रधान कृषी विभाग तसेच मार्केट कमिटीला तक्रार करा .

**– अवधूत नाना खडके, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबड**

अंबड तालुक्यात कृषी विभागाने एक पथक नियुक्त केलेले आहे . त्याच प्रकारे तालुक्यातील सर्व दुकानदारांना एमआरपी किंमतीत शेतकऱ्यांना बियाणे विकण्याबद्दल सूचनाही दिल्या आहेत . जास्त दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी आल्यास दुकान एका वर्षासाठी निलंबित करण्यात येईल . तसेच शेतकऱ्यांनी जास्त दरात बियाणे खरेदी करू नये . तसेच चांगला पाऊस पडल्यानंतरच खरीपाची पेरणी करावी . **– सचिन गिरी, तालुका कृषी अधिकारी,अंबड**

# गांजाचे सेवन आणि विक्री करणारी भिक्षेकऱ्यांची टोळी शहरात सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** शहरातील नगर परिषदेच्या क्रीडा मैदानावर भिक्षेकऱ्यांची एक टोळी मागील तीन महिन्यांपासून तळ ठोकून आहे. मुलांच्या खेळण्याच्या मैदानावर या टोळीने अतिक्रमण केले आहे. हे भिक्षेकरी परिसरातील नागरिकांना शिवीगाळ करून किंवा धमकी देत भिक्षा मागत असल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे, टोळीतील पुरुषांसह महिलासुद्धा ड्रग्ज आणि गांज्याचे सेवन करीत असून विक्रीही करत असल्याची गोपनीय माहिती आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

शहरातील जे.एम. पटेल महाविद्यालय मार्गावर नगर परिषदेचे एक मैदान असून हे मैदान लहान मुलांना खेळण्यासाठी राखीव आहे. या मैदानावर अनेकदा टूर्नामेंट होत असतात. मार्च महिन्यात खासदार चषक झाले असून अनेक वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धा खेळण्याचा मानही या मैदानाला मिळालेला आहे. मात्र आज हे मैदान भिकाऱ्यांच्या एका टोळीसाठी ड्रग-गांजाचा अड्डा बनले आहे. मात्र या गंभीर बाबीकडे नगर पालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. गोंदिया जिल्ह्यातील काचेवाणी येथून २५ ते ३० भिकाऱ्यांची ही टोळी मागील तीन महिन्यापासून या मैदानावर तळ ठोकून आहे. काही दिवस ही टोळी ग्रामसेवक कॉलोनीच्या रिकाम्या मैदानावर राहत होती. मात्र तेथील नागरिकांनी त्यांना तेथून हाकलून लावले. त्यानंतर काही दिवस त्यांनी बजाज फायनान्सच्या इमारतीखाली आपले बस्तान मांडले. मात्र तेथूनही त्यांना हुसकावून लावण्यात आले. त्यानंतर त्यांनी त्यांचा मोर्चा नगर परिषदेच्या या मैदानाकडे वळविला. या मैदानातच उघड्यावर त्यांनी संसार थाटला आहे. टोळीतील महिला आणि लहान मुले दिवसभर मैदानावर पडून असतात किंवा ये जा करणाऱ्यांना भीक मागत असतात.

# पथनाट्याद्वारे महावितरणच्या योजनांचा जागर

## वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या वर्धापनदिनानिमित्त कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरात पथनाट्य, मोटारसायकल रॅलीद्वारे महावितरणच्या योजना व सेवांची माहिती देण्यात आली. सोमवारी (5 जून) शहरात मध्यवर्ती बस स्थानक, पैठणगेट, शहानूरमिया दर्गा परिसर व पुंडलिकनगर रोड व मंगळवारी (6 जून) सूतगिरणी उपकेंद्र परिसरात महावितरणचे कर्मचारी श्रावण कोळनूरकर, रमेश शिंदे, सुनील बनसोड, अभय एरंडे, पल्लवी गायकवाड, सपना भोसले, नवनाथ पवार व बाह्यस्रोत कर्मचारी सतीश ढवळे यांनी 'महावितरण आपल्या दारी' हे पथनाट्य सादर केले. मधुकर कोळनूरकर यांनी ढोलकीवर साथसंगत केली. महावितरणच्या सेवा, वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन, ऊर्जा बचत, विद्युत सुरक्षा, वीजचोरीचे दुष्परिणाम, बनावट मेसेजपासून सावधान आदी विषयांवर पथनाट्यातून ग्राहकांचे प्रबोधन सादर करण्यात आले.
मंगळवारी (6 जून) सकाळी परिमंडल कार्यालय ते सूतगिरणी उपकेंद्र अशी मोटारसायकल रॅली व महावितरणच्या सेवा, वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन, ऊर्जा बचत, वीजचोरीचे दुष्परिणाम, बनावट मेसेजपासून सावधान आदी विषयांची माहिती देणारा चित्ररथ काढण्यात आला. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी-कर्मचारी यात सहभागी झाले होते.
कामगार कल्याण मंडळाच्या सहकार्याने सूतगिरणी उपकेंद्र परिसरात सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.श्री.मंगेश गोंदावले व मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता मोहन काळोगे, सतीश खाकसे,



उपमहाव्यवस्थापक प्रवीण बागूल, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता दीपक सोनोने, महेश पाटील, कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाचा विजय

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या व लोहा लोह्यातील जय अंबिका मच्छीमार सोसायटी बहुमताने विजयी झाले आहेत. सर्व विजयी उमेदवारांचे निवासस्थानी साउथ करण्यात आले . सदर निवडणूक प्रक्रियेत निर्णय अधिकारी सहाय्यक उपनिबंधक एस के परोडवाड होते.
मच्छीमार पतसंस्थेच्या निवडणुकीत विजयी उमेदवार असे : मारोती पंदलवाड,उत्तम पंदलवाड, गोविंद पंदलवाड, माणिक शिवरकर, बाबा शिवरकर ,नामदेव पंदलवाड , गणपती पंदलवाड ,यादव पंदलवाड,सुंदरबाई जेलेवाड, लक्ष्मी बाई हसुकवाड, दत्ता वनलवाड संचालक पदी विजयी झाले. यावेळी माजी आमदार तथा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण, पंचायत समिती सदस्य तथा नियोजन समितीचे नवनाथ बापू चव्हाण,शेषराव कहाळेकर, भीमराव पाटील शिंदे, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठू भाऊ भाऊ चव्हाण, संभाजी पाटील चव्हाण, भारत पवार आदींची उपस्थिती होती. यांनी विजयी उमेदवाराचे पुष्पहार शाल श्रीफळ देऊन स्वागत केले.

# मराठा समाजाच्या ओबीसीकरणास स्थगिती देऊन जातनिहाय जनगणना करावी

## भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सुसूत्रता यावी या उद्देशाने समिती स्थापन केली आहे. या संदर्भात शासन निर्णय दिनांक 29 मे 2023 रोजी प्रसिद्ध झाला आहे. या समितीचे अध्यक्ष महसूल विभागाचे मुख्य सचिव असून इतर मागास व बहुजन कल्याण विभाग ,विधी व न्याय विभाग ,सामाजिक न्याय व विशेष सहायता विभाग इत्यादी विभागाचे मुख्य सचिव हे सदस्य आहेत. तसेच मराठवाडा विभागाचे आयुक्त व जिल्हाधिकारी हे सदस्य आहेत. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी विविध कागदपत्राची व नोंदीची तपासणी ही समिती करणार आहे . सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा घाट शिंदे -फडणवीस सरकारने घातला आहे. तो निर्णय तात्काळ थांबवण्याची मागणी भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटनेने जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, कार्यालय यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
महाराष्ट्रातील ओबीसी कुणबी समाज वगळून मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाची तपासणी करण्यासाठी शासनाने न्यायमूर्ती गायकवाड आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने घटनेच्या कलम 15 (4) व 16 (4) अंतर्गत मराठा समाज सामाजिक व शैक्षणिक मागास असून त्याला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असा अहवाल शासनाला दिला होता. तसेच मराठा समाजाच्या बाबतीत आरक्षण देण्याची अपवादात्मक परिस्थिती असल्याचा अहवाल ही दिला होता .सदरील आयोगाच्या सर्व शिफारसी रद्दबातल करत सुप्रीम कोर्टाने मराठा समाजाला दिलेले आरक्षण रद्द केले होते .तसेच मराठा समाजाबाबत आरक्षण देण्याची कुठलीही अपवादात्मक परिस्थिती नसल्याचे न्यायालयाने कडक शब्दात स्पष्ट केले होते .तरीही शिंदे -फडणीस सरकार मराठवाड्यातील मराठा समाजास ओढून ताणून आरक्षण देण्यासाठी ओबीसीकरण करत आहे .हा सुप्रीम कोर्टाचा अवमान आहे .फक्त निवडणुकीचे गणित डोळ्यासमोर ठेवून मराठा समाजाला कुणबी समाजाशी जोडले जात आहे. ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यासाठी व कुणबी सर्टिफिकेट देण्यासाठी समिती नेमली आहे. ओबीसी प्रवर्गात समाविष्ट होण्यासाठी शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण सिद्ध करावे लागते हे काम मागासवर्ग आयोगाचे असून त्या माध्यमातून एखाद्या प्रवर्गाचा ओबीसी मध्ये समावेश केला जातो.परंतु तसे न करता सरळ कुणबी सर्टिफिकेट देऊन मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करणे म्हणजे सरळ सरळ घटनाद्रोह आहे. एखादी जात किंवा उपजात एखाद्या विभागात एका प्रवर्गात असेल तर ती त्याच पद्धतीने दुसऱ्या विभागात त्या प्रवर्गामध्ये असणार नाही. याचे कारण म्हणजे त्या त्या विभागात असणारे त्या जातीचे सामाजिक शैक्षणिक मागासलेपण आहे. यामुळेच देशातही एखाद्या राज्यात एखादी जात एस सी प्रवर्गात असेल तर ती दुसऱ्या राज्यात ओबीसी मध्ये आहे. खत्री आयोग, काका कालेरकर ,आयोग केंद्रीय मागासवर्ग, आयोग बापट आयोग व इतर समित्या अशा एकूण 10 आयोग व समित्यांनी मराठा समाजाला आरक्षण नाकारले आहे. राणे समिती व गायकवाड आयोगाने दिलेले आरक्षण सुप्रीम कोर्टाने रद्द केले आहे . कुणबी आणि मराठा एक नाहीत असा स्पष्ट निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. जगन्नाथ होले विरुद्ध महाराष्ट्र सरकार (रिट पिटीशन क्र.4476/2002) या केसच्या दिनांक 17 ऑक्टोबर 2003 चा निकाल पत्रात मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने मराठा व कुणबी हे एकच आहेत असे मानायला नकार दिला आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने 15 एप्रिल 2005 रोजी शिक्कामोर्तब केले आहे. या बाबी शासनाला लक्षात घेणे गरजेचे आहे. शासनाने नेमलेल्या समितीचे अध्यक्ष व सदस्य हे सनदी अधिकारी असून किमान त्यांनी कायदेशीर तरतुदी विविध आयोगाच्या अहवाल सुप्रीम कोर्टाचे निर्णय तपासून ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून द्यायला हवी होती. परंतु हे सनदी अधिकारीही शासनाच्या दबावापोटी असंविधानिक व सुप्रीम कोर्टाच्या निकालाच्या विरुद्ध वर्तन करत आहे.



# भाजपा महिला मोर्चा छत्रपती संभाजीनगर ग्रामीणची महत्त्वपूर्ण बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील भाजपा जिल्हा कार्यालय उस्मानपूरा येथे भाजपा महिला मोर्चा छत्रपती संभाजीनगर ग्रामीणची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस भाजपा प्रदेश सरचिटणीस श्री.संजय भाऊ केणेकर,भाजपा महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस सौ.मिना मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्या तथा भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा पुष्पाताई काळे, गंगाताई ताठे, राणीताई सोनवणे, मंगलाताई आसवार, ज्योतीताई गायकवाड, अर्चनाताई पवार,सौ.ऐश्वर्या अभिषेक पा. गाडेकर, संगीता पाटील व सर्व तालुकाध्यक्षा व जिल्हा कार्यकारिणीतील सर्व महिला पदाधिकाऱ्यांसह सदस्यांची उपस्थिती होती.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मॉन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्स्लटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.



# अहिल्यादेवी होळकर पुण्यश्लोक सेवा मंडळाची भव्य रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती 298 जयंतीनिमित्त पुण्यश्लोक सेवा मंडळाची भव्य रॅली काढण्यात आली. आडगाव नंतर किनगाव गावामध्ये उत्सव समितीचे अध्यक्ष रमेश काटकर प्रकाश बोंबले आणि उल्हास ढेपले यांनी संबोधन केले नंतर विशाल जेठे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी किशोर काटकर अक्षय सावळे नवनाथ जेठे मुक्तेश्वर पल्हाळ विशाल जेठे उल्हास ढेपले विभक्ती भोजने दादाराव भोजने अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.

# गुन्हे शाखेकडून लाखोंचा पान मसाला जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्थानिक गुन्हे शाखेने एक मोठी कामगिरी बजावली आहे इंदोर वरून पुणे जाणारी गाडीमधून पान मसाल्याची तस्करी होताना सोनगीर हद्दीत पकडण्यात आली त्यात मुद्देमाल सहित एकूण ४३ लाख ६८ हजारांची कारवाई करण्यात आली आहे.
परराज्यातुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पान मसाल्याची तस्करी होत असल्याने मा . पोलीस अधिक्षक श्री . संजय बारकुंड यांनी पोलीस निरीक्षक श्री . हेमंत पाटील , स्थानिक गुन्हे शाखा , धुळे यांना सुचना देवून कारवाई करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते . सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असतांना पो.नि. श्री . हेमंत पाटील , स्थागुशा , धुळे यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर बातमी मिळाली की , इंदोर कडून पुणे कडे जाणारे आयशर ट्रक क्रमांक एम एच १८ बी जी ३३०२ त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटख्या विक्री करण्याचे उददेशाने वाहतुक होत आहे . त्या अनुषंगाने खात्री करुन कायदेशीर कारवाई करण्याचे पथकाला आदेशीत केले होते . स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला नरडाणा पोलीस स्टेशन हददीतील हॉटेल अन्नपुर्णा जवळ बातमीप्रमाणे आयशर ट्रक येतांना दिसल्याने त्यास थांबवून त्यावरील चालकाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सदाशिव रामचंद्र राठोड वय ३५ , धंदा ड्रायव्हर , रा.महुगाव ता.महु जि.इंदोर , मध्यप्रदेश असे सांगितले त्याचे सोबत असलेल्या इसमास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव सिकंदर कैलास सोनगरा वय ४५ , रा . हरसोला , ता.महु जि.इंदोर असे सांगितले . त्यांना ट्रकवरील मालाबाबत विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिल्याने ट्रक मधील मालाची खात्री केली असता परचुटनमालासोबत खालील वर्णनाचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा व पान मसाला मिळून आला तो ,एम सेन्टेड तंबाकु गोल्ड,रजनीगंधा पान मसाला,तुलसी रॉयल लालपाणी जर्दा विमल पान मसाला,व्ही . १ तंबांकु,डबल ब्लॅक १८ प्रिमीयम तंबाकु,राजश्री पानमसाला, चैनी खैनी प्रिमियम फिल्टर पाऊच, परचुटन,आयशर ट्रक,आर . एम . डी .पान मसाला एकुण ४३,६७,९९८/- ची कारवाही करण्यात आली आहे.वरील वर्णनाचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत पान मसाला , तंबाकु विक्री करण्याच्या उददेशाने वाहतुक करीत असतांना मिळून आल्याने , अन्न व औषध प्रशासन विभाग , धुळे यांचे मार्फत पुढील कारवाई सुरु आहे . सदरची कारवाई श्री . संजय बारकुंड , पोलीस अधिक्षक , श्री . किशोर काळे , अपर पोलीस अधिक्षक , धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. श्री.हेमंत पाटील , योगेश राऊत , प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटील , योगेश चव्हाण , प्रकाश सोनार , कमलेश सुर्यवंशी ,प्रशांत चौधरी , राहुल गिरी , मयुर पाटील , तुषार पारधी ,योगेश साळवे अशांनी केली .



## कर्मण्य संजय गायकवाडला दहावीत 98 %

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** कर्मण्य संजय गायकवाड ( मुखेडकर ) याने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी परीक्षेच्या निकालात 98 टक्के गुण घेऊन यश मिळवले आहे. कर्मण्य हा राज्य कामगार विमा योजना सोसायटीचे स्टेट नोडल ऑफिसर डॉ. संजय माधवराव गायकवाड यांचा चिरंजीव आहे.
या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. गायकवाड कुटुंबिय मूळचे होनवडज, ता. मुखेड जि.नांदेड येथील रहिवासी आहेत. कर्मण्य याने मुंबई येथील आय ई एस मॉडर्न स्कूल येथून दहावी पर्यंत शिक्षण घेतले. ह्यापूर्वी त्याने मास्टरमाईंड परीक्षेमध्ये भारतामधून तिसरा क्रमांक मिळविला आहे. त्याने महाराष्ट्र शासनाची स्कॉलॅर्शिप परीक्षा आणि डॉ. होमी भाभा परीक्षा देखील उत्तीर्ण केली आहे. या यशाचे श्रेय त्याने आपल्या आई कल्पना गायकवाड, वडील डॉ.संजय गायकवाड, मोठा भाऊ संकल्प( जो IIEST कोलकाता येथे एरोस्पेस अभियांत्रिकी पदवी शिक्षण घेत आहे ) व आजी पार्वतीबाई माधवराव गायकवाड यांना दिले आहे , या यशाबद्दल त्याचे मावशी , काका, मामा, मामी, आत्या, बहीण इत्यादी भावंडांनी मिळून त्याचा सत्कार करीत त्यास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कर्मण्यच्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## नेव्हीमध्ये निवड झालेल्या भारतीचा अहिल्यादेवी होळकरांची मूर्ती देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील भारती शिवाजी काटकरची नुकतीच इंडियन नेव्ही मध्ये निवड झाल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यश्लोक सेवा मंडळाच्या वतीने भारती काटकर हिला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन तिचा गौरव करण्यात आला शिवाजी काटकर यांची कन्या भारती काटकर हिने हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन यश मिळवले शिवाजी काटकर हे अल्पसुधारक शेतकरी असून या हलाखीच्या परिस्थितीत ही त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी मदत केली भारती काटकर हिने सुद्धा पोलीस भरतीची परीक्षा दिली पोलीस भरतीमध्ये अपयश आले तरी तिने जिद्द न सोडता लगेच नेव्ही मध्ये अग्निवीर या पदाची परीक्षा दिली आणि निवड झाली. तिच्यायशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे यावेळी रमेश काटकर, प्रकाश बोंबले,विशाल जेठे, किशोर काटकर, नवनाथ जेठे, अक्षय सावळे, मुक्तेश्वर पल्लाळ,सागर साबळे,उल्हास ढेपले, विभक्ती भोजने, संजय गोरे, राधाकृष्ण जेठे, बा.सां. ग्रामपंचायत सदस्य कल्याण शिवाजी काटकर आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्याच्या मुलीने मिळवले 90.20 टक्के

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** कठीण परिस्थितीमध्ये स्वतः सिद्ध करत वाशी येथील सचिन हनुमंत येताळ या शेतकऱ्याची कन्या आकांक्षा सचिन येताळ हिने दहावीच्या परीक्षेत 90.20 टक्के गुण वडिलांच्या कष्टाचं चीज केल आहे. वाशी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयातून इयत्ता दहावीत आकांक्षा सचिन येताळ हिने 90.20टक्के गुण मिळवले आहेत. त्यामूळे तिच्यावर वाशी शहरासह तालुक्यातून सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे. वडिलांचा वडिलोपार्जित शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरीतून कशीबशी शेती कसत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे वरचेवर अवघड होत असल्याने, पूर्णतः शेतीवर अवलंबून राहून संसाराचा गाडा हाकने डोईजड होऊ लागल्या मुळे, निसर्गाने जरी पावसाळ्यात सातत्य ठेवले नाही. तरी मला मुलांसाठी काहीतरी करावेच लागेल व त्यांना घडवावे लागेल उद्देशाने या शेतकऱ्याने शेतीला पूरक दुग्ध व्यवसाय निवडला जिद्द व चिकाटीच्या जोरावर करत कुटुंबाला आर्थिक स्थिरतेकडे घेऊन नेले. त्याचबरोबर लिहिता वाचता येत नसल्यामुळे समाजात वावरताना येणाऱ्या अडचणी सतत मनाला सलत असल्याने आपल्या मुलांना मात्र शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करायचे हे स्वप्न ऊराशी बाळगणाऱ्या या शेतकऱ्याने अतिशय काटकसरीने चालनारा संसार त्याच्यातूनच थोडी थोडी बचत करत, थेंबे थेंबे तळे साचे या म्हणी प्रमाणे, आजच्या या महागड्या शिक्षणप्रणाली मध्ये स्वतःच्या लेकरांच्या शिक्षणाबाबत मात्र कुठलीही काटकसर केली नाही. ही अतिशय अभिमानाची बाब आहे.
तिच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका गाढवे मॅडम, वर्गशिक्षक सर, शाळेतील इतर शिक्षक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.
रात्रंदिवस शेतीमध्ये काबाडकष्ट करणाऱ्या बापाच्या कष्टाचे मुलीने चीज केल्याने गावात सर्व स्तरावर तिचे कौतुक होत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# विधवा भगिनींचा सत्कार व वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज



**कुरखेडा :** येथील सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी वटपौर्णिमेच्या निमित्याने, नेहमी प्रमाणे समाजाची पर्वा न करता विधवा भगिणींना समाजात सन्मान मिळावा त्यासाठी आपल्या स्वगृही बोलावून त्यांच्याशी स्नेहबंधनाचे धागे विणले. या छोट्याशा कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेत कार्यरत असलेल्या संगीता तुमडे उपस्थित होत्या. वक्ते म्हणून विजया राऊत कृषिसेविका या होत्या. विधवा भगिणी प्रमुख पाहुणे म्हणून कविता पिलारे, रजनी कापगते, प्राजक्ता सोंलखे, जांभूळे, गावळ उपस्थित होत्या. त्या शुभ प्रसंगी विधवा भगिणींनी आपल्या मनोगतातून आपल्या व्यथा, वेदना व समाजाचा बघण्याचा दृष्टिकोण कसा असतो हे व्यक्त केले. संगीता ठलाल या आमच्या विषयी लिखाणाच्या माध्यमातून विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी नेहमीच प्रयत्न करत असतात पण, प्रत्यक्षात करुन सुध्दा दाखवतात आमच्यासाठी समाजाकडून होणारा त्रास सहन करतात हे सोपे नाही संगीता ताई नेहमीच समाजाच्या हितासाठी विविध विषयांवर लिखाण करुन समाजजागृती करत असतात. तसेच त्या धडपडत असतात. आजच्या दिवशी आमच्या डोळ्यातील अश्रू पाहून एवढा मोठा आम्हाला सन्मान दिला अशा महिला या समाजात निर्माण होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे मुख्य वक्ता म्हणून विजया राऊत यांनी आपल्या भाषणातून विधवा भगिणींनी हिंमत हारू नये, जीवन अनमोल आहे. जगलेच पाहिजे स्वतःला कमी लेखू नये, असे मार्गदर्शन केले.

अध्यक्ष म्हणून लाभलेल्या तुमडे यांनी आपल्या अध्यक्ष भाषणातून बोलतांना म्हणाले की, महिला ही सर्वात श्रेष्ठ आहे. ती श्रेष्ठ असून सुद्धा होणारा त्रास सहन करते त्या पेक्षा तिने बोलायला शिकले पाहिजे स्वतःला विधवा म्हणून कोसत राहू नये तर जगाला दाखवून द्यायला पाहिजे एक महिला सर्व काही करू शकते त्यासाठी हिंमत ठेवावी व जगाचा विचार न करता स्वतंपणे जगले पाहिजे वाचन संस्कृती जपले पाहिजे. त्यावेळी तुमडे यांचा शाल, पुष्पगुच्छ, पुस्तक, वस्त्र देऊन संगीता ठलाल यांनी सत्कार केला तसेच उपस्थित असलेल्या प्रत्येक विधवा भगिणींना पुष्पगुच्छ, वस्त्र, पुस्तक घेऊन सत्कार केला. कवयित्री संगीता ठलाल यांचा हा आगळा वेगळा उपक्रम पाहून सर्वांनी कौतुक केले. पुढच्या वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिले. त्यावेळी निशा गद्देवार, वर्षा वालदे, विभा भोयर, पोरेटी, चिकराम, पूर्णा ठलाल तसेच भगिनी व बालगोपाल उपस्थित होते. प्रास्ताविक कवयित्री संगीता ठलाल यांनी केले. सुत्रसंचालन लता मार्गीया यांनी केले व आभार प्रदर्शन रेखा मोहणे यांनी मानले. वटपौर्णिमेच्या निमित्याने झाडे लावा, झाडे जगवा या संदेशातून कुरखेडा येथे असलेल्या बगीच्या समोर सार्वजनिक ठिकाणी रेखा मोहणे, माधुरी मुंगमोडे, वनिता कापगते, जेष्ठ भगिणी सुभद्राबाई नाकाडे, अश्विनी सयाम, हेमीनाबाई नैताम, कवयित्री संगीता ठलाल या सर्वांच्या उपस्थितीत वडाचे झाड लावून वृक्षारोपण केले.

# महिलेचा विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जिल्ह्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये अलीकडे वाढ होताना दिसत आहेत. बलात्कार, विनयभंग, छेडछाड अशा दिवसाला एक ते दोन घटना दररोज घडत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातही तरुणी व महिलांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे.

अशीच एक विनयभंगाची घटना परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पीडित महिलेच्या पतीने हाकलल्यानंतरही एक विकृत व्यक्ती केवळ चड्डी आणि बनियन घालून महिलेच्या घरात शिरला. याप्रकरणी रात्री उशिरा आरोपीच्या विरोधात विनयभंग, मारहाण व शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. उमेश रघुनाथ जवंजाळ (४४, रा. अंजनगाव सुर्जी, ह.मु. परतवाडा) असे आरोपीचे नाव आहे. तक्रारीनुसार, शनिवारी रात्री पीडित महिला घरी एकटी असताना आरोपी उमेश जवंजाळ हा चड्डी बनियनवर फिर्यादी महिलेच्या खोलीकडे जात होता. तेवढ्यात फिर्यादी महिलेचे पती आले.

त्यांनी ते पाहिले. मी घरी नसताना माझ्या घराकडे अशाप्रकारे का जात आहेस, असा जाब विचारत त्यांनी त्याला हाकलून दिले व ते हातपाय धुण्यासाठी बाथरूममध्ये गेले. त्यावेळी उमेश जवंजाळ हा फिर्यादी महिलेच्या खोलीत अर्धनग्न स्थितीत शिरला. त्यामुळे महिला जोरात ओरडली. त्यामुळे तिच्या पतीने बाथरूमबाहेर धाव घेत आरोपीला जाब विचारत पुन्हा हाकलले. त्यानंतर आरोपी हा महिलेच्या

पतीच्या अंगावर मारण्यासाठी धावला आणि शिवीगाळ केली.



# धुळे -सोलापूर महामार्गांवरील अवैध वाळूचा हायवा पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** गोदावरी नदीपात्रातून वाळू उपसा करून अवैधपणे वाळू वाहतूक करणारा विना पासिंग व विना नंबरचा हायवा धुळे -सोलापूर महामार्गांवरील गहिनीनाथनगरच्या हॉटेल बासुरी जवळ तहसीलदार चंद्रकांत शेळके सह महसूल पथकाने दि 5 जून रोजी पहाटे 6 वाजता पकडला आहे. यामध्ये 5 ब्रास वाळू व हायवा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पकडलेला हायवा पथकाने तहसील कार्यालय येथे लावला असून यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. ही कारवाई तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलिस उपनिरीक्षक गणेश राऊत,तलाठी प्रफुल मिसाळ, कृष्णा मुजगुले, विजय जोगदंड,राम महाले ज्ञानेश्वर चौरे, कोतवाल सतीश राक्षे, मनीष जिरेकर यांनी केली आहे. गोदावरी नदी पात्रातून होत असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीमुळे जिल्हाधिकारी विजय राठोड अप्पर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे यांच्या आदेशाने वाळूबंदी विरोधी पथक नेमण्यात आले आहे.अंबड तालूक्यातील पथकास मिळालेल्या माहिती वरून पथकाने शहागडहुन छत्रपती संभाजीनगरकडे जात असतांना धुळे -सोलापूर महामार्गांवरिल गहिनीनाथनगरच्या हॉटेल बासुरी जवळ पकडला. हा हायवा विना पासिंग व विना क्रमांकाचा असून त्यामध्ये 5 ब्रास वाळू व हायवा असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर हायवा तुकाराम गायकवाड यांचा आहे. पकडलेला हायवा हा दंडात्मक कारवाईसाठी तहसील कार्यालय अंबड येथे लावण्यात आला आहे.

# चोरट्यांनी ए.टी.एम पळवले, पोलिसांच्या पाठलागानंतर ए.टी.एम टाकून पोबारा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव येथील ॲक्सिस बँकेच्या मुख्य शाखेतील लाखो रूपयांसह चोरट्यांनी चक्क ए.टी. एम.च उखडून पळविण्याची घटना घडली. मात्र लासलगाव पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग केल्याने चोरट्यानी घाबरून ए.टी.एम पोलिसांच्या गाडीपुढे फेकत पळ काढला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, लासलगाव - विंचूर रोडवर ॲक्सिस बँक असून त्या बँकेचे ए.टी.एम मशीन बँकेलगतच्या गाळ्यात आहे. सोमवार दि.०५ रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात चार चोरट्यांनी सदर ए.टी.एम मशीन उखडले व त्यातील अंदाजे १५ लाख रुपयांसह संपूर्ण मशीन सोबत आणलेल्या इर्टिका क्रमांक एम.एच.१५ ए.झेड ०५७ या गाडीतून पळवून नेले. ही घटना ॲक्सिस बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यान्वित असलेल्या सी.सी. टी.व्ही.त कैद झाल्याने बँकेच्या अधिकाऱ्यांनी सदर घटनेची माहिती लासलगाव पोलिसांना फोनद्वारे दिली. घटनेची माहिती मिळताच स.पो.नि.राहुल वाघ, पो.कॉ प्रदीप आजगे, हवालदार कैलास महाजन, ए.एस.आय नंदकुमार देवडे, हवालदार देवा पानसरे, होमगार्ड पगारे हे तातडीने घटनास्थळी दाखल होत नाकाबंदी करून जलदगतीने तपासाची चक्र फिरवली. पो.नाईक योगेश शिंदे, कर्मचारी सुजित बारगळ यांनी एका खाजगी गाडीद्वारे सदर चोरट्यांच्या शोधार्थ पाठलाग सुरू केला. विंचूर औद्योगिक वसाहती नजीक एक कार अत्यंत कमी गतीने चालली होती. त्यामुळे पोलिसांना संशय आला व त्यांनी त्या कारचा पाठलाग सुरू केला. पाठलाग करणाऱ्या गाडीत पोलीस असल्याची खात्री झाल्याने घाबरून चोरट्यानी नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील बोकडदरे शिवारात हॉटेल साईप्रसाद नजीक ए.टी.एम.पोलिसांच्या गाडीपुढे फेकले, त्यामुळे पोलिसांना वेग कमी करून ए.टी.एम.ची काळजी घ्यावी लागली. या गडबडीत चोरटे पळ काढण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी ए.टी.एम मशीन व त्यातील अंदाजे १४,८९,४०० लाख रुपये रोख रक्कम घटनास्थळावरून ताब्यात घेतली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न फसला आहे, मात्र चोर पळून जाण्यात सफल झाले. याप्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात चोरीचा गुन्हा दाखल आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अप्पर पोलिस अधीक्षक माधुरी कांगणे, उपविभागीय पोलिस अधिकारी सोमनाथ तांबे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. ॲक्सिस बँकेच्या शाखेत ए.टी.एम आहे तिथे सुरक्षा रक्षक नव्हता. त्याचबरोबर ए.टी.एम ला पक्के फाउंडेशन नव्हते त्यामुळे अवघ्या तासाभरात चार चोरटे ए.टी.एम उखडून नेण्यात यशस्वी झाले. त्यामुळे ॲक्सिस बँकेची सुरक्षा व्यवस्था रामभरोसे असल्याचे निस्पन्न झाले.



लाखो रूपयांसह ए .टी .एम .ची च चोरी करणे हा दुर्मिळ प्रकार असून पोलिसांनी जीव धोक्यात घालून पाठलाग करीत चोरीचा प्रयत्न असफल ठरवला आहे . चोरट्यानी ए .टी .एम पोलिसांच्या गाडीपुढे फेकल्याने चोरटे पळून जाण्यात सफल झाले आहेत . मात्र रक्कम सुरक्षित असुन चोरीचा प्रकार सी .सी .टी .व्ही . मध्ये कैद झाल्याने लवकरच चोरटे पकडले जातील .

**स .पो .नि .राहुल वाघ**

ॲक्सिस बँकेच्या एटीएमची चोरी झाल्याचे लक्षात येताच आम्ही लासलगाव पोलिसांना खबर दिली . त्यांनी तात्काळ दखल घेऊन नाकाबंदी केली व पाठलाग करीत एटीएम हस्तगत करण्यात यश मिळवले . त्याबद्दल लासलगाव पोलिसांचे अभिनंदन .

**दिलीप शिंदे, व्यवस्थापक ॲक्सिस बँक**



# अप्पर जिल्हाधिकारी यांनी केली पालखी मार्गाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आषाढी वारीसाठी पैठण येथील संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याची तयारी चालु आहे. पैठण तहसील कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे यांनी तहसील कार्यालयात संत एकनाथ महाराज पालखी प्रमुख रघुनाथ महाराज पालखीवाले यांच्या उपस्थितीत आढावा घेतला. यंदाच्या पैठण पंढरपूर पाई पालखी रथ सोहळ्यात प्रस्तान दिवशी सोई सुविधा देण्यात याव्या व पैठण ते पंढरपूर पर्यंत पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात आली,यात प्रामुख्याने पहिल्या दिवशी मुक्कामी जाताना पालखी मार्गावरील रस्ता ,काटे काडुन स्वच्छता करण्या बाबत पहील्या मुक्काम ठिकाणी जाण्यार्या रस्त्याची गोदावरीच्या तीरावर जावुन पाहणी केली. लाईट व्यवस्था, तसेच पालखी ओटा ठिकाणी स्वच्छता सोहळ्या दरम्यान वारकर्यांना औषधोपचार आदी व्यवस्था करण्याच्या सुचना प्रशासनास देवुन यंदा तापमान लक्षात घेता वारकरी भाविकांनी काळजी घ्यावी तसेच अरोग्य विभागानी वारकऱ्यांना सुविधा परवाव्या अशा सुचना केल्या. यावेळी तहसीलदार चव्हाण,मुख्याधिकारी संतोष आगळे, मुकुंद महाजन,पगारे, योगेश महाराज पालखीवाले, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, मनोज वैद्य,कनिष्ठ अभियंता सव्वाशेयांची उपस्थिती होती.

# रेल्वे, फलाटामधील फटीमध्ये पडूनही महिलाचे प्राण वाचले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बैतूल येथे रामपाल महाराज यांचा सत्संग ओटोपून परत जाणाऱ्या एका महिलेने चालत्या रेल्वेगाडीत चढण्याचा प्रयत्न केला. त्यांचा पाय घसरला आणि त्या चक्क रेल्वेगाडी आणि फलाट यामधील फटीत पडली. रेल्वे सुरक्षा दलाच्या उपनिरीक्षकाने धावत जाऊन गाडीची साखळी खेचली आणि गाडी थांबली. या महिलेला बाहेर काढण्यात आले. आरपीएफच्या जवानामुळे या महिलेचे प्राण वाचले. मात्र डाव्या पायाला गंभीर इजा झाली. ही घटना आमला येथे घडली. ही महिला दक्षिण एक्स्प्रेसने नागपूरला येत होती.

(१२७२२) दक्षिण एक्सप्रेस आमला येथून नागपूरकडे रविवारी दुपारी ३ वाजून ४५ मिनिटांनी फलाट क्रमांक दोन वरून सुटली. एक वयोवृद्ध महिला प्रवासी चालत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न करीत होती. त्यांचा पाय घसरून तोल गेला आणि त्या पडल्या. उपनिरीक्षक शिवरामसिंह यांनी फलटावर तैनात होते. त्यांनी धावत जाऊन रेल्वेगाडीची साखळी खेून गाडी थांबवली. सहायक उपनिरीक्षक एस.एन. यादव आणि पोलीस शिपाई हरमुख गुर्जर यांना बोलावून प्रवाशांच्या मदतीने फलाट आणि रेल्वेगाडी यामधील फटीत अडकलेल्या महिलेला बाहेर काढण्यात आले. या महिलेचे नाव बुधनीबाई धनसाय पटेल असून तिचे वय ७० वर्ष आहे. ती छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यातील रोगदा येथील आहे. त्या आपले कुटुंबीय आणि गावातील नागरिकांसोबत बैतूल येथे रामपाल महाराज यांचा सत्संगात गेल्या होत्या. दक्षिण एक्स्प्रेसने घरीत परत जात होत्या. या गाडीच्या सर्वसाधारण डब्यात गर्दी असल्याने त्या शयनयान डब्यात बसल्या होत्या. गाडी आमला येथे आल्यानंतर त्या सर्वसाधारण डब्यात जाण्यासाठी उतरल्या. सर्वसाधारण डब्यापर्यंत जाण्यापूर्वीच गाडी सुरू झाल्याने त्या परत शयनयान डब्यात चढण्याचा प्रयत्नात असताना पाय घसरला. त्यांचा तोल गेला. गाडी आणि फलाटामधील फटीत त्या पडल्या.

# जरा घ्या की रं ध्यानात, झाडं लावा की रानात ! कवी नरशिंग इंगळे

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २९

आधुनिक केसरी

**(आज ७ मार्च अर्थात पावसाचा वाढदिवस ! आज पाऊस पडावा वाटणं स्वाभाविक आहे.त्यासाठी आपण काय तयारी केली ? हा प्रश्नही महत्वाचा.आपल्या रानांची पेरणीपुर्व मेशागत जव ळ जवळ संपत आलेली असणार.गाडगुड सुरु झाली की पहिलं काम 'पेरणी' तुकोबा म्हणाले तसं 'मडं झाकुन पेरणी करा !' एकदा का रानाची वाफ निघुन गेली की पेरुन उगवण्याचा काळ हातुन गेल्यासारओखं आहे ते.त्यामुळं पेरणीला पहिलं प्राधान्य.अजून शाळा-कॉलेजेसचे प्रवेश सुरु व्हायला आठवडा आहे तेंव्हा रानं पेरुन घेण्यासाठीच्या कामांची आपली धांदल उडणं स्वाभाविक आहे.एकदा का रानं पेरुन झाली की स्वाभाविकपणे शाळा महाविद्यालयाच्या प्रवेशासोबतच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचा उपक्रम आपण सर्वांनीच वैयक्तिक, सामुहिक पातळीवर घेऊन आपलं घर, परिसर,परस,रानं,रस्ते,गावाचं आकर,मोकळ्या जागा, रस्त्याच्या कडंनं जिथं जागा दिसंल तिथं वृक्षरोपण करावं आणि वृक्षसंवर्धनासाठी तत्पर रहावं. या प्रसंगी कांही कविंच्या सहज गुणगुणता येतील एकट्यानं, समुहानं इथं देण्याचा मोह मला आवरता आला नाही.जागे आभावी इतरही मौविक कवितांचा मला सहभाग करुन घेता आला नाही ज्यात कवी गोविंद पाटील, कवी एकनाथ आनाड कवि चांदगुडे यांच्या दर्जेगार कवितांचा समावेश होतो.या प्रसंगी आपण वक्षलागवडी संदर्भातील कवी नरशिंग इंगळे, कवी सुधाकर देशमुख कवी राजेश रेवले, कवी गोरख शेंद्रे आणि वृक्ष संवर्धनासंदर्भातील माझ्या एका आपल्याला परिचीत असलेल्या कवितेचा आस्वाद घेऊयात.)**

दारी अंगणी लाविलं रोप वाढलं का बाई ?
दारी अंगणी लाविलं रोप वाढलं का बाई ?
त्याच्या बुडाचं कैचन कुणी काढलं का बाई ?
येता जाता गुरुढोरं, तोंड घालती ल्हाचंर,
काटी कुंपण करुन झाड राखलं का बाई ?
कधी साळावेत फाटे कधी खुडावेत शेंडे,
येड्या वाकड्या फाट्याला कधी छाटलं का बाई ?
टाक शेणाचा पवटा, खात उरला-सुरला,
सांडपाणी त्याच्या आळ्यामंदी टाकलं का बाई ?
जया ओसरी ना वटा, नाही अंगणात झाड,
अशा घरादारामंदी सुख नांदलं का बाई ?
फुलं,फळं,सावली नि जन्मभर शुद्ध हवा,
झाड सोयरा म्हणाला 'तुका' वाचलं का बाई ?
मुकुंद राजपंखे

या कवितेच्या संदर्भानं कांही महत्वाच्या गोष्टी : वृक्षारोपण कार्यक्रमानंतर घ्यावयाची काळजी याबद्दल कांही बोलू पहाणारी ही रचना. दरवर्षी पाऊस पडतो.आपण दरवर्षी संकल्प केलेले असतातच वृक्षारोपणाचे.त्यानुसार सबंध पावसाळाभर खड्डे खोदून रोपं लावली जातात मान्यवर पाहुण्यांच्या हातुन.त्या झाडांना नीटपणे आळे करुन पाण्याची व्ययवस्था करणंही आपलंच कर्तव्य असतं आणि आपण ते पार पाडणंही गरजेचंच आहे. नीट कुंपण करुन अथवा ट्री-गार्ड लावून हावरट जनावरांपासून काळजी घेता येते झाडांची. वेळोवेळी खतपाणी दिलेले झाडं उद्या मोठे होवून आपल्यालाच शुद्ध हवा अर्थात ऑक्सिजन, पाणी, सावली, फुलं, फळं आणि अखेर इंधणही देणार आहेत या बद्धलचं जनजागरण होणं फार गरजेची गोष्ट आहे.

छान गुणगुणता येते. समुहानं शाळेत गायली गेली गेली तर या कवितेचं आणि त्यातुन व्यक्त झालेल्या विषयाचं सोनं होईल. हरीत क्रांतीसाठी या शब्दांना हवी तशी छान चाल देवून ही रचना गुणगुणंली तर ताजं सुंदर गाणंही करता येतं या रचनेला.

आपण वृक्षारोपण म्हणून केलेली कृती किती फलदायी ठरते आहे याबद्दल आपणच गांभिर्यानं घ्यायला हवं. सरकार करोडो रुपयांच्या यौजना तयार करतं त्याचं इंप्लीमेंटेशन होणं फार गरजेची गोष्ट आहे. धु-या बांधावर, रस्त्यांच्या कडेला, डोंगरभागांनी हिरवळ करुन टाकायला काय हरकत आहे ?झाड आहे तर आनंद आहे. जमीनीवरली ही हिरवी जागा अुदास होता कामा नये नाही तर मनाच्या पातळीवर आपण फार ओसाड होवून जाणार आहोत.

हे मरेल वाळलेपण काय कामाचं ?

हे सांगीतलं पाहिजे, शिंहावलोकण केलं पाहिजे म्हणून 'प्रत्याभरण' या संकल्पनेत मोडणारी ही मुकुंद राजपंखे यांची रचना !

जरा घ्या की रं ध्यानात !
**नरशींग इंगळे,(लातूर)**
जरा घ्या की रं ध्यानात ; झाडं लावा की रानात,
जरा घ्या की रं ध्यानात ; पाणी आडवा की रानात.
उन वाढलं वाढलं ; होते जिवाची काहिली,
शेतक-याच्या शेतात नाही झाडाची सावली,
हिरवा रंग पानांचा ; जरा साठवा की मनात.
शेतात ठिबक लावू ; थेंबा थेंबानं पाणी देवू,
महत्व पाण्याचं जानून घेऊ ; पुढल्या पिढीला कांही तरी देवू, किती सांगावं, किती सांगावं ; तुमच्या रं कानात ?
झाड सावली माऊली ; गोड फळं तुम्हा हो दिली,
तुम्ही सारी झाडं तोडली ; निसर्गाची अवकृपा झाली.
भविष्य आलंया, भविष्य आलंया, आलंया धोक्यात.

कवी नरसिंग इंगळे हा रोज शेतीत राबणारा आनंदी कवी. लातूरच्या साहित्यिक वर्तुळातला जिंदादिल मनुष्य. गावचा सरपंच राहिलेला हा मनुष्य रानावर प्रचंड प्रेम करतो.लेकरावर करावी येवढी उत्कट माया सद्गृहस्थाची शिवारावर आहे.कधी धु-यावर बसून, कधी कपासीच्या हिरव्यागार वावरात, कधी डौलदार उसाच्या रानात, कधी कोट्यासमोर बाजंवर बसून तर कधी खळ्यात उभा राहून, टाळाच्या निनादात आपल्याच तालात दंग होऊन कविता रेकॉर्ड करुन स्वतः कवितेचा मनसोक्त आनंद घेत सन्मित्रांच्या आनंदासाठी फेसबुकावर अपलोड करणारा निर्मळ नमुष्य.

मला या कविची ही कवितेचा आनंद देण्या-घेण्याची निरागस पद्धत मनस्वी आवडली. कसला अभिनिवेश नाही ना कसली अहंकारी भूमीका.रानाला आपली पंढरी समजून आनंदानं जगणारा हा मनुष्य आहे.

दोनेक महिन्यापुर्वी, एप्रील मधे डॉ बाबासाहेब ठोंबरे सर आणि त्यांच्या कृषी महाविद्यालय लातूरच्या राष्ट्रीय सेवा यौजना युनिटनं महापूर येथे आयोजित केलेल्या कविसंमेलनाचे कवी इंगळे महोदय उद्घाटक होते, राजेसाहेब कदम सूत्रसंवादक आणि मी कविसंमेलनाध्यक्ष होतो.कवी जनार्धन सोनवणे, राजेश रेवले, हनुमंत घाडगे, अनुराधा सूर्यवंशी आणि राजेंद्र रापतवार या मैफिलीत सहभागी होते. डॉ विलास टाकणखार यांचं नितांत सुंदर नियोजन होतंआणि कविवर्य राजेसाहेबांचं बहारदार सूत्रंचालनाने मैफिल बहरली होती.या कविसंमेलनाची सुरुवात उद्घाटक म्हनूण इंगळे महोदयांनी समयोचित ही सुंदर कविता आवेशपुर्ण गाऊन सादर केली. ऐकताना कानाला आणि अर्थातच मनाला इतकी गोड लागली की ती गोडी आजवर विसरली नाही.ज्या ठसक्यात ते 'जरा घ्या की रं ध्यानात, झाडं लावा की रानात' म्हणतात, तो आनंदाची परमसीमा असते.

झाड रुजू दे मनात
राजेश रेवले
अरे माणसा माणसा झाड असते माऊली,
स्वतः उन्हात राहुन तुला देते रे सावली.
अरे माणसा माणसा मळे सजव झाडांनी,
भरेल ती तुझी ओटी फळे, पिकल्या पाडांनी.
अरे माणसा माणसा झाडे लावशील तेंव्हा,
ऋण तुझे मानुनिया देईल ते शुद्ध हवा.
अरे माणसा माणसा सारा दुष्काळ जाईल,
लावलेल्या रे झाडांनी धरा हरवी होईल.
अरे माणसा माणसा बघ लाऊनिया झाड,
जिव लाऊनिया तुला जपेल ते जिवापाड.
अरे माणसा माणसा नको ऊशिर लावूस,
झाडे लाव लवकरी नक्की पडेल पाऊस.
अरे माणसा माणसा एक गोष्ट घे ध्यानात,
झाड हिरवं हिरवं आधी रुजू दे मनात.

९ जानेवारी २०२३ रोजी ही कविता वसंतराव नाईक कृषी विद्यापिठाच्या 'कृषी मित्र' या मुखपत्रात छापून आली. सोबतच महोदयांनी एका शाळेत बॅनरवर लावलेली ही कविता मुली सामुहिक म्हणंत, लईमधे



गात असलेली टाकुन वाचकांना मोठा आनंद दिला. आज या लेखण प्रपंचाच्या निमित्तानं विचार करताना पाऊस आणि वृक्ष असा विषय मनात घोळंत राहिला ज्याचं अखेर हे असं कांही लिहिण्यात रुपांतर झालं, ज्याचा आनंद वाटणं स्वाभाविक आहे सन्मित्रहो !

कवी राजेश रेवले नैकोटा ता सोनपेठचे.परळी गंगाखेड रूटवर दहा पंधरा किलोमिटर दूर.नौकरी प्रशाकिय कार्यालयात कृषी महाविद्याल अंबाजोगाईत. ही कविता वृक्षारोपणासहीत वृक्षसंवर्धनासाठी आग्रह धरते.माणवांची बदलती जीवनशैली, वातावरणातील उष्णतेचा अतिरेक जिवघेणा सिद्ध होत असताना या कवितेची हाक आपण ऐकली नाही तर येऊ घातलेल्या काळात उन्हाने जिवाची लाही लाही झाल्या शिवाय राहणार नाही.एका शाळेने ही कविता बॅनर करुन आपल्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी आणि वृक्षोपणाची प्रेरणा मिळावी म्हणून उपलब्ध करुन दिली होती.

सन्मित्रहो ! आनंद याहून मोठा तो कोणता ?

**एक तरी झाड लाव माणसा एक तरी झाड लाव !**
सुधाकर देशमुख ( म्हमदापुर )
उजाड झाले डोंगर माथे, उजाड झाला गाव,
एक तरी रोप लाव माणसा, एक तरी झाड लाव.
हे वसुंधरेचं लेणं, जर सर्व गेलं संपून,
संपेल सृष्टी संपेल मानव, आरं संपेल आपला गाव.
बंद झाले नदीचे वाहणे, ऐकु येईना कोकिळ गाणे,
सावध हो रे भल्या माणसा, पाण्याविना थांबलिया नाव.
झाड मागंत नाही कांही, ते अखंड देतंच राही,
जाणिव असू दे याची माणसा, नको घालू मुळावर घाव.

सुधाकर देशमुख म्हमदापूर,ता अंबाजोगाईचे रहिवाशी.महाराष्ट्रभर त्यांची ओळख वृक्षमित्र म्हणून आहे.गड्याचं कामही तसंच भारी आहे.अवघं कुटुंब वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धणासह वृक्षांचीही माणसांसारणी टाळकी मोजून सातबा-यावर नोंद घेतली पाहिजे यासाठी सहकुटुंब सद्गृहस्थ नागपूर अधिवेशनात उपोषण केलेलं आहे.वृक्षबीज संकलन करुन लेकराच्या वाढदिवसी त्याच्या वजनाईतके बीज पंचायत समिती अंबाजोगाईच्या साक्षिनं गावोगावी वाटप करण्याचं काम केलं आहे.

सद्गृहस्थ गोड गळ्याचा वृक्षमित्र असल्यानं आपल्या प्रतिष्ठानच्या वतीनं जनजागरणाचे कार्यक्रम करतात ज्यात या कवितेचा हमखास समावेश असतो. आम्ही आग्रहपुर्वक ही कविता श्रोत्यांपुढं ठेवण्याचा सद्गृहस्थाला आग्रह करतोच करतो, ज्याचा परीनामही फार सुंदर होतो परीसरावर.'कुटुंब रंगलं झाडात' म्हणावं इतकं या मंडळीनं झाडाला आपलं गणगोत करुन घेतलं आहे.

**संत म्हणावे झाडाला !**
**गोरख शेंद्रे.**
ओढ ज्यांना मांगल्याची, तेच फुलत राहिले.
असे वैशाखी वणवे,त्यांनी मातीत गाडले.
फुलायचे स्वप्न जया,आधी खाली खाली जाती.
रंग घेऊनी संगती,येती फुलुनी वरती.
भेद सारे मावळुनी ; देती आनंद विश्वाला,
करी नमन गोरक्ष ; संत म्हणावे झाडाला.

कवी गोरख शेंद्रे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा राडीचे मराठी विषयाचे विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. शालेय शिक्षणासह त्यांनी आपल्या शाळेत झाडंच झाडं लावून शाळा हिरवीगार केली आहे.शाळेतली लेकरांची 'हरीतसेना' तयार करुन त्यांना वृक्षारोपण आणि संवर्धनाचे कृतीयुक्त धडे दिले आहेत.सुट्यांच्या काळात शाळेत जाऊन लेकरं हाताशी धरुन झाडांना पाणी देऊन झाडं वाचवली, वाढवली आहेत. आणि म्हणुनंच सारे भेद मावळून अवघ्या विश्वाला आनंद देणा-या झाडाला कवी संत संबोधून वंदन करतो ! शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधे राडीच्या शाळेतुन सेवा निवृत्त होत आहेत.सलग ५८ वर्षे विद्यार्थी कल्याणासाठी आणि वृक्षचळवळ, साने गुरुजी कथा माला आणि हल्ली अंबाजोगाईच्या मसापचे सचीव म्हणून कार्यरत आहेत.मागील वर्षी त्यांना माजलगाव मसापच्या ग्रामिण साहित्य लंमेलनाचा अध्यक्ष करुन सन्मानीत केलं आहे. मृदु अंतःकरणाच्या सज्जन सद्गृहस्थाची लेकरं, झाडं, कविता आणि कथा हे विषय जिव्हाळ्याचे आहेत.ही कविता आणि या कवितेतील आषयाशी संबंधीत सद्गृहस्थाचं काम अभिनंदनीय आहे.

या वेगळ्या धाटणीच्या मांडणीचा शेवट करताना आज ७ जुन असल्याची मला जाणिव आहेचय. परळीचे वंदनीय जेष्ठ साहित्यिक आबासाहेब वाघमारे अर्थात आमचे आबा वाघमारे गुरुजी आम्ही शिकंत असताना ७ जुनला हमखास 'पावसाचा वाढदिवस' संबोधत. पावसाच्या आभ्यासक्रमातल्या आणि त्यांच्या वाचणात आलेल्या कविता ऐकवत.आम्ही आनंदून जात.त्या काळात कविता लिहायला सुरुवात केली ती अजुन सुरु आहे.तर आज पावसाच्या वाढदिवसाच्या अर्थात मृगनक्षत्राच्या आपणा सगळ्यांना हार्दिक शुभेच्छा सन्मित्रहो ! तुमच्या सृजनशील जगण्याला पाऊल लगडून राहो !

चार चांगले लोक तुमच्या जिव्हाळ्याचे असणं हीच तर तुमची मिळकत, हीच तर तुमची श्रीमंती.तुकोबा म्हणतात तसं वनराई आणि वृक्षांचं चिक्कार गणगोत असलेली ही कवी मंडळी ख-या अर्थानं आनंदाच्या वर्तुळात वावरणारे प्राणवायू आहेत.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आहेत आणि इंग्रजी भाषा व साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**




## सेंट जॉनचा शंभर टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सेंट जॉन इंग्रजी हायस्कूल, हडको शाळेचा नेहमीप्रमाणे यावर्षीसुदधा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. शाळेचे एकूण 46 विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत बसले होते.

यापैकी प्रणीता चौव्हाण व रुतुजा सोनवणे यांनी 96.40 टक्के या दोघींनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच अजिंक्य कोलते 96.20 टक्के घेऊन द्वितीय व 94.60 टक्के घेऊन रोहण बंड तृतीय क्रमांक मिळविला. आर्या अमृतकर 94. 40 टक्के, मधुरा पवार 93. 60 टक्के अजिंक्य पाटील 92. 80 टक्के, आयुश शिराळे, 92. 40 टक्के, तेजस्विनी भेंडे 92.40 टक्के, शुभम गावंडे 91.40 मानसी वायकोस 91. 20 टक्के, संघर्ष नागे 91. 00 टक्के, राम देव 90. 40, ओमकार मोटे 90. 40 टक्के घेऊन उत्तीर्ण झाले. शाळेचे 41 विद्यार्थी विशेष प्रावीण्य मिळविले. 4 विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर 1 द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

विद्याथ्र्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव जेम्स् डोंगरदिवे, संचालिका पल्लवी डोंगरदिवे, मुख्य गट समन्वयक आकाश सरकटे, मुख्याध्यापिका अनुराधा देशपांडे, शालेय विकास प्रमुख नमीता पार्थसारथी यांनी यशवंतांचा सत्कार केला आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.